# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ / अग्रहायण २९, १९४४ ( शके )**

## मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

---

### चंद्रपूर महानगरपालिके अंतर्गत नवीन चंद्रपूर येथील मलनि:सारण वाहिनी व एसटीपी २४ एमएलडीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१) * ४९५१७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिके अंतर्गत नवीन चंद्रपूर येथील मलनि:सारण वाहिनी व एसटीपी २४ एमएलडी चे काम मेसर्स ईगल लिमिटेड कंपनीला देण्यात आले असता या कंपनीने ५३ कोटी २९ लक्ष २२ हजार रुपयांचे निष्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरून करोडो रूपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे करुनही या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवीन चंद्रपूर येथील मलनि:सारण वाहिनी व एसटीपी २४ एमएलडी या कामाबाबत संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था यांच्या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अहवालाच्या अनुषंगाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांना या प्रकरणी चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर शहरातील सिमेंट रस्त्याच्या डिपीआरमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) * ५०८९४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेअंतर्गत शहरातील सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी तज्ञ अभियंते असतानाही खाजगी संस्थाकडून ७ कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करुन सदरहू सिमेंट रोडचा डिपीआर तयार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी संस्थाकडून डिपीआर तयार करुनही त्यातील त्रुटींमुळे शहरातील ५८ रस्त्यांवर व अनेक चौकात वारंवार पाणी साचत असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी संस्थाकडून डिपीआर योग्य पध्दतीने तयार करण्यात आलेला नसून यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

नागपूर शहरात कॉस्ट इफेक्टीव्ह व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांच्या समान आर्थिक सहभागातून सिमेंट काँक्रिट रस्ते प्रकल्प टप्पा २ राशी रु.३०० कोटी व टप्पा ३ राशी रू.३०१ कोटी असा राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने प्लेन टेबल/टोटल स्टेशन सर्व्हे, ट्रॅफिक सर्व्हे करून रस्त्यांचे डिझाईन करणे व इतर तांत्रिक स्वरूपाची कामे करणे करिता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची नेमणुक करणे व प्रत्यक्ष कामाचे वेळी तांत्रिकदृष्ट्या पर्यवेक्षण करण्यास्तव संस्थेची नेमणूक करणे आवश्यक होते. याकरीता स्थायी समितीच्या मान्यतेने व्यवस्थापकीय सल्लागार व सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यात आली. याकरीता शासनाने शासन निर्णय दि.४ जून २०१८ अन्वये प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता व प्रदानाकरीता दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार नागपूर महानगरपालिकेद्वारे प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही,

दि.१२ सप्टेंबर, २०२२ रोजी ६८.४३ मी.मी. व १३ सप्टेंबर, २०२२ रोजी सरासरी १००.४६ मी.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली असून या संततधार पावसामुळे काही काळ पाणी चौकाचे ठिकाणी तुंबले होते. तथापि पाऊस थांबल्यानंतर पाणी नाल्यातून वाहून गेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(३) * ४९५९४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण महानगरपालिका रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असून रुग्णालयातील बहुतांश विभाग हे कंत्राटी पध्दतीने सुरु असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील अतिदक्षता व डायलेसिस विभाग देखील बंद असून वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन तसेच कंत्राटदारांचे मानधन थकित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर रुग्णालयातील एक मोकळा भूखंड हा सूपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता राखीव ठेवण्यात आला असूनही याबाबत महानगरपालिकेकडून कोणताच आराखडा तयार करण्यात न आल्याने विभागातील नागरिकांना अतिगंभीर आजारांच्या उपचाराकरीता मुंबईतील कुपर, के.ई.एम. किंवा नायर रुग्णालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय हे मुंबईच्या पश्चिम उपनगरातील उत्तरेकडील परिसरात सर्व सेवा-सुविधा असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एकमेव रुग्णालय असून, सदर रुग्णालयातील गुणवत्तावान वैद्यकीय उपचार सुविधा नागरिकांना प्राप्त होत आहेत.

सदर रुग्णालयातील वैद्यकीय व शल्यचिकित्सा अतिदक्षता विभागामध्ये बहिस्त्रोत पध्दतीने केवळ इन्सेन्टिव्हिस्टची सेवा तसेच डायलेसिस सेंटरमध्ये केवळ डायलेसिस टेक्निशियन्सची सेवा प्रतिपूर्ती स्वरुपात कंत्राटी तत्वावर घेण्यात येत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर रुग्णालयातील वैद्यकीय व शल्यचिकित्सा अतिदक्षता विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, सदर रुग्णालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत डायलेसिसची सेवा पुरविण्यात येत आहे.

तसेच, इन्सेन्टिव्हिस्टची सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराला माहे ऑगस्ट, २०२२ पर्यंतचे सर्व महिन्यांच्या कामाच्या देयकांचे नियमानुसार अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. तसेच, सदर कंत्राटदाराने माहे सप्टेंबर, २०२२ च्या देयकासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी व त्याचे अधिदानासंबंधित प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर रुग्णालयाच्या आवारातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या रिकाम्या भूभागावर एकूण ३२५ रुग्णशय्यांची क्षमता असलेले सुपर स्पेशालिटी रुग्णालय व इतर इमारतीच्या प्रकल्पाचे काम करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, यशस्वी उमेदवारास कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर ठिकाणी प्रस्तावित प्रकल्प उभारणीची कामे सुरु झाली असून, पावसाळ्यासहित ३६ महिन्यांत प्रकल्प बांधणीचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मौजे चाविंद्रा / पोगांव येथील मंजूर गृहनिर्माण प्रकल्पाबाबत

**(४) * ५१२१७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मौजे चाविंद्रा / पोगांव येथील आरक्षण क्रमांक १२४ अ येथील गृहनिर्माण प्रकल्पाकरीता राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाची मूळ किंमत सन २०१९ मध्ये ६७५ कोटी रुपये इतकी होती, परंतु ठेकेदार जुन्या दराने काम करण्यास तयार नसल्याने भिवंडी महानगरपालिकेने त्यांचा ठेका रद्द करुन सदर नवीन दराने सुधारित करण्यासंदर्भात नगरविकास विभागाचे मार्गदर्शन मागविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या नवीन दराने सदर प्रकल्पाची किंमत सुमारे १००० कोटी रुपयांपर्यंत होणार असल्याने पुर्वी १० लाख ६५ हजार रुपयांत मिळणाऱ्या घरांची किंमत आज किमान १७ ते १८ लाख रुपये होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी शहराच्या मध्यभागी या पेक्षा बऱ्याच कमी किंमतीत घरे विक्रीसाठी उपलब्ध असताना १००० कोटी रुपये रक्कमेच्या इतक्या मोठ्या स्वरुपाचे प्रकल्प हाती घेण्यापुर्वी फिजीबिलीटी तपासणे गरजेचे असतांना देखील भिवंडी महानगरपालिकेने या प्रकल्पाची फिजिबिलीटी तपासली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
अद्याप नविन दराने प्रकल्प सुधारीत केला नसल्याने, घराची सुधारीत किंमत ठरलेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५) आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या प्रस्तावास अनुसरुन, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र. १२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) मंजूर प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने हाती घेण्यासंदर्भात दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी शासन आदेश निर्गमित केला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील वैद्यकीय विभागाने 'हाय व्हॅक्युम सक्शन मशीन' खरेदी निविदा प्रक्रियेत केलेला गैरव्यवहार

**(५) * ५०२२८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील वैद्यकीय विभागाने निविदा प्रक्रियेद्वारे ‘हाय व्हॅक्युम सक्शन मशीन’ खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेमध्ये निश्चित केलेल्या तांत्रिक मापदंडापैकी जवळजवळ १४ अटींचे उल्लंघन करुन मे.सेवर्ड सिस्टम्स INC, बोरिवली, मुंबई या वितरकास (Ardo Medical AG) या कामाचे आदेश देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित ठेकेदार, जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन उक्त खरेदी निर्णय रद्द करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी लेखी पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील वायसीएम रूग्णालयाकरीता आवश्यक हाय व्हॅक्युम सक्शन मशीन खरेदी करण्यास वैद्यकीय सल्लागार समितीने दिलेल्या मान्यतेनुसार तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीस अनुसरून जेम पोर्टल या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.
या निविदेमध्ये मे.सेवर्ड सिस्टम्स INC, बोरीवली, मुंबई यांचे लघुत्तम दर प्राप्त झालेले होते. त्यामुळे नियमाधीन तरतूदीनुसार सुरक्षा अनामत रक्कम घेऊन करारनामा करून दि.१३.०७.२०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत मे.सेवर्ड सिस्टम INC, बोरीवली, मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता.

(३) हे खरे आहे.

(४) हाय व्हॅक्युम सक्शन मशिन निविदेबाबत मा.विधानसभा सदस्य व एल-२ निविदाधारक यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वायसीएम येथे पुरवठा झालेले हाय व्हॅक्युम सक्शन मशिन हे निविदेतील स्पेसिफिकेशननुसार आहे किंवा कसे याबाबत महानगरपालिकेमार्फत वायसीएम येथील महानगरपालिकेचे बायोमेडीकल इंजिनिअर यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

वायसीएम येथील बायोमेडीकल इंजिनिअर यांनी तपासणी अहवालामध्ये हाय व्हॅक्युम सक्शन मशीन हे निविदेतील स्पेसिफिकेशननुसार नसल्याबाबत महानगरपालिकेस अहवाल दिलेला आहे. सदरहू अहवाल तसेच मे. सेवर्ड सिस्टम्स INC, बोरीवली, मुंबई यांनी निविदा अटी व शर्तीनुसार व निविदेमध्ये सादर केलेल्या स्पेसिफिकेशननुसार हाय व्हॅक्युम सक्शन मशीन पुरवठा न केल्याने त्यांनी पुरवठा केलेले साहित्य अस्वीकृत करुन दि.१३/०७/२०२२ रोजी दिलेले पुरवठा आदेश रद्द करण्यात आले असून त्यांनी सदर निविदेकरीता सादर केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आली असल्याचे आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

महानगरपालिकेने पुरवठा आदेश रद्द केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मे. सेवर्ड सिस्टम्स INC, बोरीवली, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी व देवनार परिसरातील नागरीक प्रदूषणामुळे त्रस्त झाल्याबाबत

**(६) * ५२४८० श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी, देवनार डंपिंग ग्राऊंडपासून अर्ध्या किलोमीटरच्या परिसरात जैववैद्यकीय कचऱ्यासाठीचा एक प्रकल्प सन २००० पासून उभारण्यात आला असून यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात प्रदूषणाचा त्रास होत असल्यामुळे याविरोधात नागरीकांनी न्यायालयाकडे दाद मागितली असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या परिसरात असलेल्या वस्त्यांमध्ये दमा व क्षयरोग अशा आजारांचे प्रमाण वाढले असून सन २०१५ मध्ये टाटा समाज विज्ञान संस्थेच्या माध्यमातून झालेल्या अभ्यासामध्ये शिवाजी नगर, मानखूर्द व बैगनवाडी या परिसरात सर्वाधिक प्रमाणात क्षयरोगाचे रुग्ण आढळले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील पार्श्वभूमीवर उक्त परीसरातील प्रदूषण कमी व्हावे व येथील हवा स्वच्छ असावी याकरिता उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सद्य:स्थिती अहवालानुसार नजीकच्या परिसरामध्ये असलेल्या ५ दवाखान्यातील रुग्णांचा गेल्या ३ वर्षाचा अहवाल पाहता उपरोक्त दवाखान्यात उपचार घेतलेल्या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन आरोग्यावर विपरित परिणाम झाल्याचे आढळून येत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०६ जुलै, २०१९ रोजी प्रकल्प बंदचे आदेश दिले असून, सदरील संस्थेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या बंदच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे W.P.No (ST) २०८९/२०१९ च्या अन्वये याचिका दाखल केलेली असून मा.उच्च न्यायालयाने सदरील बंदच्या आदेशाला स्थगिती दिलेली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर प्रकल्प रायगड जिल्हातील अत्करगाव, तालुका खालापूर येथे स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु असून त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमती पत्र घेतले आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती करिता अर्ज केला आहे व दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात आली आहे.

सदर प्रकल्पास प्रकल्पातील हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुधारण्याबाबत (Upgradation) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची सुधारणा सप्टेंबर, २०२२मध्ये पूर्ण झाली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर (जि.चंद्रपूर) महाऔष्णिक विद्युत केंद्रातील प्रदूषणामुळे मृत्युच्या संख्येत झालेली वाढ

**(७) * ५३०२१ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) महाऔष्णिक विद्युत केंद्रामुळे शहरात वाढत्या प्रदूषणामुळे विविध आजार होऊन लोकांच्या मृत्युंच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५-२००६ या वर्षातील आरोग्य विभागाच्या अहवालात जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणामुळे ५० टक्के नागरिक श्वसनाच्या विविध आजाराने ग्रस्त असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ मध्ये माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार शासकिय रुग्णालयात दरवर्षी प्रदुषणाने ३० हजार नागरिक विविध रोगाने ग्रस्त असल्याचे निदर्शनास आले असून त्यात हृदयरोगाचे ८५०५, फुफूसाच्या आजाराचे २१४३, चर्म रोगाचे ३९६७, डोळ्याचे विकार ६३९८ व कॅन्सरच्या २६५ रुग्णांचा तसेच इतर रोगांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर शहरालगतच्या ४ औद्योगिक क्षेत्राचा एकत्रित सर्वसमावेशक कृती आराखडा तसेच चंद्रपूर शहरातील हवा प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेने तयार केलेला चंद्रपूर शहर कृती आराखडयाची (Non-Attainment City Action Plan) प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे काय, असल्यास त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून दि. ०६/१२/२०२२ रोजीच्या प्राप्त अहवालानूसार आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नसल्याचे नमूद केलेले आहे.

(४) व (५) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने भारतातील १०० औद्योगिक वसाहतींचा प्रदूषण निर्देशांक जारी केला असून यामध्ये चंद्रपूर शहरालगतच्या ४ औद्योगिक क्षेत्रांचा (म.औ.वि.मं चंद्रपूर, म.औ.वि.मं ताडाली, बल्लारपूर व म.औ.वि.मं.घुग्घूस) एकत्रित परिपूर्ण पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) नुसार क्रमांक २७ व्या क्रमांकावर आहे व सदर निर्देशांक ७६.४१ इतका आहे (त्यातील हवा निर्देशांक ७५.०, जल निर्देशांक २३.७५ व जमीन निर्देशांक २३.७५) मंडळाने पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने प्रदूषणाबाबतचे गुणांकन कमी करण्याच्या दृष्टीने या ४ औद्योगिक क्षेत्रांचा एकत्रित परिपूर्ण पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कृती आराखडा तयार केला असून त्याची भागधारकांकडून प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

तसेच चंद्रपूर शहरातील हवा प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेने चंद्रपूर शहर कृती आराखडा राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत (Non-Attainment City Action Plan) तयार केला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

मा.राष्ट्रीय हरीत लवाद, खंडपीठ पुणे यांनी दिलेल्या दि.२०/०१/२०२२ रोजीच्या निर्देशानूसार मे.चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांना रु.५.० कोटींची पर्यावरणीय नूकसान भरपाई जमा करण्याबाबत आदेश दिलेले होते. सदर आदेशास मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/०२/२०२२ रोजीच्या निर्देशानूसार स्थगिती दिली आहे.

केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय बदल, भारत सरकार यांच्या दि. ०५.०९.२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार मे.चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रांमधून उत्सर्जित होणाऱ्या सल्फर डायऑक्साईड नियंत्रणाकरीता फ्लू गॅस डिसल्फरायजेशन सयंत्रणा दि. ३१.१२.२०२५ पर्यंत बसवण्याचे बंधनकारक केले आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सदर उद्योगातून होणाऱ्या प्रदूषणाबाबत वेळोवेळी पाहणी करून कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.मोरवा, राईमुर्धे व मुर्धे (जि.ठाणे) गावात स्थानिकांचा विरोध असतांना मेट्रो कारशेडचे आरक्षण टाकण्यात आल्याबाबत

**(८) * ५३०६३ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) शहर विकास आराखड्यात स्थानिकांचा विरोध असतांना मौ.मोरवा राईमुर्धे व मुर्धे गावात मेट्रो कारशेडचे आरक्षण टाकण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाईंदरजवळील मौ.मोरवा गावातील नियोजित मेट्रो विकास आराखड्यात कारशेडचे आरक्षण ठेवण्याविरोधात स्थानिक पातळीवर ग्रामस्थांकडून ११७१ हरकती आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावित मेट्रो कारशेड प्रकल्पामुळे मौ.मोरवा, राईमुर्धे व मुर्धे गावातील ४२८ हून अधिक बांधकामे, शेतजमिनी व घरे बाधीत होणार असल्यामुळे ग्रामस्थांकडून मेट्रो कारशेड शासकीय जागेत उभारण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जागेच्या वापर बदलाबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी शासनास दि.२१.१०.२०२१ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरून मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौ.मोरवा येथील स.नं.१९ पै. (जुना स.नं.१७५ पै.) व इतर व मौ.मुर्धे येथील स.नं.८९ पै (जुना स.नं.१६६ पै.) व इतर एकुण क्षेत्र सुमारे ३२ हे, जागा "मेट्रो कार डेपो" याकरीता आरक्षित करण्याअनुषंगाने शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१ कक) ची आम जनतेकडून हरकती / सुचना मागविण्यासाठीची सूचना दि.१९/०९/२०२२ व शुध्दीपत्रक दि.११/१०/२०२२ रोजी शासन राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केली आहे.

(२) सदर प्रसिध्दीकरणानुसार नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभागीय कार्यालयास आतापर्यंत १२७३ हरकती सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

(३) सदर अर्जातील प्रमुख मुद्दा हा प्रस्तावित मेट्रो कारशेड प्रकल्पामुळे मौ. मोरवा, राईमुर्धे आणि मुर्धे या गावातील बांधकामे, शेतजमिनी व घरे बाधीत होणार असल्यामुळे मेट्रो कारशेड शासकीय जागेत उभारावी ही आहे.

(४) व (५) प्राप्त हरकती / सुचना, नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई, यांचा अहवाल व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय शासनास प्राप्त झालेनंतर, अहवाल व अभिप्राय विचारात घऊन सदर फेरबदल प्रस्तावावर कलम ३७ (१कक) (ग) मधील तरतुदीनुसार उचित अंतिम निर्णय घेण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील मुंब्रा बायपास रोडजवळ असलेल्या**
**साईकृपा चाळीवर दरड कोसळून झालेला अपघात**

**(९) * ५०७६३ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा बायपास रोडजवळ असलेल्या साईकृपा चाळीवर दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दरड कोसळून जीवित व मालमत्तेची हानी झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डोंगरावर अद्यापही बरेच दगड असून ते केव्हाही खाली येऊन भीषण अपघात होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे, त्यामुळे तेथील डोंगरावर संरक्षक जाळ्या बसविणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अपघातग्रस्तांना आर्थिक मदत व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या मुंब्रा बायपास रोड जवळच्या साईकृपा चाळीवर दिनांक ०२.०९.२०२२ रोजी दरड कोसळली होती, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, मुंब्रा बायपास रोडचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.
ठाणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदर दुर्घटनेमध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून काही घरांच्या मालमत्तेचे नुकसान देखील झाले आहे.
(२) व (३) सदर डोंगर परिसरात अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता डोंगर उतारावरील दगड मातीचे सर्वेक्षण करणे, डोंगर उतारावर जाळ्या बसविणे इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. उक्त बाबीचे गांभिर्य विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे ठाणे महानगरपालिकेमार्फत पत्रव्यवहार करण्यात आला असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
सदर दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांना महसूल विभाग, ठाणे मार्फत रु. ४ लक्षची आर्थिक मदत देण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) दहावीच्या**
**विद्यार्थ्यांसाठी शासनाने घोषित केलेल्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(१०) * ५०२८८ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण (बार्टी) संस्थेतर्फे दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी अर्थसहाय्य योजना राबविण्याची घोषणा तत्कालीन मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेनुसार विद्यार्थ्यांना जेईई, नीट व सीईटी अशा परिक्षांसाठी अकरावी आणि बारावी अशा दोन वर्षांत मिळून दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचेही मा.मंत्री महोदयांनी त्यावेळी घोषित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येऊन त्यामध्ये ४ हजार ५०० विद्यार्थी पात्रही ठरले होते तथापि सदर पात्र विद्यार्थ्यांना घोषित केलेली रक्कम अद्यापही मिळाली नसल्यामुळे तसेच त्यानंतर पुढील वर्षी त्याबाबतची अर्ज प्रक्रियाच राबविण्यात आलेली नसल्याचे दिनांक १ जुलै, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेबाबत चौकशी केली असता, “योजनेच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंतिम धोरण तयार करण्याचे काम सुरु आहे, विद्यार्थ्यांना नामांकित संस्थांच्या माध्यमातून मार्गदर्शन करुन या योजनेबाबत सकारात्मक निर्णय होईल” असे बार्टी संस्थेचे महासंचालक यांचेकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) दहावीच्या (एस.एस.सी.) परिक्षेत ९० टक्के अथवा त्यावरील गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचीत जातीतील गरीब विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी सारख्या परिक्षेच्या तयारीसाठी वर्ग ११ वी व १२ या दोन वर्षात प्रति विद्यार्थी प्रत्येकी एक लक्ष असे एकूण रुपये २ लक्ष देण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कार्यालयाने शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासनाच्या अखत्यारीतील दवाखाने / रुग्णालयातील पदे भरण्याबाबत

**(११) * ५१४४३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखाने / रुग्णालयांसह राज्य शासनाच्या रूग्णालयात कर्मचाऱ्यांचा तुटवडा असून महाविद्यालयात अधिव्याख्याते (४९%) आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये पॅरामेडिकल कर्मचारी (४३%) आणि वैद्यकीय कर्मचारी (३८%) यांची मंजूर पदे आणि कार्यरत कर्मचारी यांच्यात तफावत असून अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासनाच्या अखत्यारीतील दवाखाने / रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत एक दंत महाविद्यालय व चार वैद्यकीय महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांत अधिव्याख्यातांची (सहायक प्राध्यापक) एकूण ७७१ पदे असून, त्यापैकी ३८७ पदे रिक्त आहेत. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या सर्व रुग्णालयांमध्ये पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची एकूण १६,६३१ पदे असून, त्यापैकी ३६६२ पदे रिक्त आहेत व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या एकूण २९५० पदांपैकी १०९२ पदे रिक्त आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई संचालनालयाच्या अंतर्गत २२ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयात प्राध्यापकांच्या मंजूर ४९० पदांपैकी १०५, सहयोगी प्राध्यापकांच्या ११२६ पदांपैकी १५६ व सहायक प्राध्यापकांच्या १७६५ पदांपैकी ७९७ पदे रिक्त आहेत, असे वैद्यकीय शिक्षण विभागाने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महाविद्यालयांत अधिव्याख्यातांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच आरोग्य विभागातील इतर पदे भरण्याबाबत दिनांक २५.०८.२०२२ रोजी मंजुरी प्राप्त झाली असून, त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कार्यालयातील गट क मधील लिपिक संवर्गीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट क व ड संवर्गाच्या पदभरतीबाबत बिंदुनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही सुरु आहे, असे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई संचालनालयाच्या अंतर्गत अध्यापकीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, सरळसेवेची वर्ग-३ संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार, पदभरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी टि.सी.एस. या कंपनीची निवड करण्यात आली आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वर्ग-४ संवर्गातील पदे जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत भरण्यात येणार असून, त्याअनुषंगाने सर्व अधिष्ठातांना सूचना देण्यात आल्या आहेत, असे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील महानगरपालिकेतील मक्तेदारांनी अटी व शर्तींचे उल्लघंन करुन कामे अपुर्णावस्थेत ठेवल्याबाबत

**(१२) * ५४२३१ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेद्वारे मे.दिग्वीजय एंटरप्रायजेस कंपनी, नाशिक यांना अटी व शर्तीच्या अधीन राहून मालेगांव शहरातील डास नियंत्रण व जंतुनाशक फवारणी प्रतिदिन रुपये १,१०,०००/- दर निश्चित करुन २१ प्रभागामधील कामे करण्यासाठी माहे सप्टेंबर, २०२१ ते जुलै, २०२२ या कालावधीकरिता कंत्राट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु सदरहू कंपनीने आजतागायत कोणत्याही प्रभागात फवारणी व अन्य कामे पुर्ण केलेली नसल्याबाबत स्थानिक नागरिकांनी व पदाधिकारी यांनी महानगरपालिकेकडे तक्रार करुनही अद्याप कंपनीविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत १४/१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संपुर्ण रस्ते, गटार साफसफाई करणे व डास निर्मुलन धूर फवारणी, अळीनाशक व किटकनाशक औषध फवारणीची कामे करण्यास महानगरपालिका महासभा व स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार, महानगरपालिकेमार्फत मे.दिग्वीजय एंटरप्रायजेस, नाशिक यांना दि.२३/०३/२०२१ नुसार कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर कामाचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून ०५ वर्षांचा आहे.

(२), (३) व (४) सदरहू कंपनीने फवारणी व अन्य कामे पुर्ण केली नसल्याबाबत महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, सदर मक्तेदाराच्या कामामध्ये काही प्रमाणात त्रुटी/दोष आढळलेले आहेत.

याबाबत मक्तेदारास महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी नोटीसा देण्यात आल्या असून त्यांची सर्व देयके थांबविण्यात आलेली आहेत.

मक्तेदाराच्या कामात सुधारणा झाल्यानंतरच व त्याने यापूर्वी केलेले दुर्लक्ष व बेजबाबदारपणामुळे त्यांचे देयकातुन दंड म्हणून विशिष्ट रक्कम वसूल केल्यानंतरच सदर बिले अदा करण्यात येतील, अशी सक्त भूमीका महानगरपालिकेमार्फत घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या सक्त भूमिकेमुळे व बिले अदा न केल्यामुळे मक्तेदाराने दि.३०/०९/२०२२ पासून काम बंद केले आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत सदरचे काम करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील रमाई घरकुल योजनेचे अनुदान मिळण्यास होत असलेली दिरंगाई

**(१३) * ५०९८८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसुचित जाती व नवबौध्द समाजातील कुटुंबासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत सन २००८ पासून रमाई आवास योजना राबवली जात आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील रमाई आवास योजनेतंर्गत १० हजारापेक्षा अधिक घरे बांधण्याचे प्रलंबित असून जुन्या व नवीन पात्र ४००० लाभार्थ्यांची संख्या प्रस्तावित असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रमाई घरकुलाच्या कामांसाठी शासनाकडून १०० कोटीं रुपयांची आवश्यकता असून काही लाभार्थ्यांनी उसनवारी करुन घरकुलांची बांधकामे पुर्ण केली असून मागील दोन वर्षापासून लाभार्थ्यांना एकही हप्ता मिळालेला नसल्याने बहूतांश घरकुले ही अपुर्णास्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना त्यांच्या घरांच्या बांधकामाचे काम पूर्ण करण्यासाठी अनुदान देणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,

**(माहे ऑक्टोबर २०२२ अखेर)**

| अ.क्र. | जिल्हा | क्षेत्र | उद्दीष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण घरकुले | प्रगतीत असलेली घरकुले | अपुर्ण घरकुले | रद्द करण्यात आलेली घरकुले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सोलापूर | महानगर पालिका | ६६९० | ३३५४ | २५१९ | ५०३ | ३३२ | ० |
| २ | सोलापूर | नगर पालिका | ११३७८ | ५२९० | १८८० | १५८६ | १७८६ | ३८ |
| ३ | सोलापूर | ग्रामीण | १७६८९ | १७५४७ | १३१८६ | ४३६१ | ० | ० |

(३) हे खरे नाही.

सन २०२२-२३ मध्ये रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत रू.७५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून रू.२६२.५० कोटी इतका निधी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. तसेच रमाई आवास योजना (शहरी) अंतर्गत रू.५००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून रू.१७५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

**(माहे ऑक्टोबर २०२२ अखेर) (रू.लाखात)**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | क्षेत्र | प्राप्त तरतूद | खर्च | शासनास समर्पित तरतूद | शिल्लक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सोलापूर | महानगर पालिका | ९९१०.७४ | ६७०६.८६ | १७९६.०० | १४०७.८८ |
| २ | सोलापूर | नगर पालिका | १०३१७.७७ | ६६०८.८६ | २२९३.०० | १४१५.९१ |
| ३ | सोलापूर | ग्रामीण | १७२६५.७० | १७२६५.७० | ०.०० | ०.०० |

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगापूर (जि.नाशिक) येथिल रिसॉर्ट चालकांनी मलजल पूर्वपरवानगी न घेता धरणात सोडल्याबाबत

**(१४) * ५१८१७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरणालगत असलेल्या ॲक्वा, व्हिस्टा व्हिला, आर्या तसेच चौधरी फार्म्स या रिसॉर्ट चालकांनी कोणतीही प्रक्रिया न करता मलजल गंगापूर धरणात सोडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिसॉर्ट सुरु करण्यापूर्वी चालकांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची पुर्व परवानगी घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धरणातील जलप्रदूषण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली तसेच संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीदरम्यान संमतीपत्र न घेतलेल्या दोषी उद्योगांना संमतीपत्र घेण्याबाबत समजपत्र व कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित उद्योगांनी त्यांचे उद्योगातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावरती योग्य ती प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविलेल्या आहेत. दरम्यान,

मे.ॲक्वा व्हिस्टा व्हिला, सर्वे नं. ४२/३, मु.पो. गंगावरे, ता. व जि. नाशिक या उद्योगाने संमतीपत्रासाठी अर्ज न केल्याने सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०२/१२/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.

मे.सतिश गोविंदा चौधरी एचयुएफ ॲड इतर २, गट नं ४१/१/ब, सर्वे नं. ४१/१/अ/३ आणि ४१/१/अ/१, मु.पो. गंगावरे, ता. व जि. नाशिक या उद्योगाने उद्योग उभारणी संमंतीपत्रासाठी दि. १६/०६/२०२२ रोजी अर्ज दाखल केला असून सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १९/०९/२०२२ रोजी अटी व शर्ती अनुसरुन उद्योग उभारणीसाठी संमतीपत्र प्रदान करण्यात आले.

मे.रिसायडींग वॉटर एल.एल. पी. (आर्या हॉटेल) गट नं. २/३/२, आणि २/६, मु.पो. गंगावरे, ता. व जि. नाशिक या उद्योगाने दि. २९/०६/२०२२ रोजी संमतीपत्रासाठी अर्ज दाखल केला असून सदर अर्जावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने कुष्ठरोग व क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * ५०२७३ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ ते १२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत राबविलेल्या विशेष मोहिमेत २४८ क्षयरोग व १०५ कुष्ठरोग रुग्णांची नोंद झाली असून यामध्ये १२ बालकांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे महानगरपालिकेच्यावतीने राबविलेल्या आरोग्य शिबिरातही १५ जणांना कुष्ठरोगाची लागण झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कुष्ठरोग व क्षयरोग आजारावर नियंत्रण आणण्यासाठी तसेच त्याचे समुळ उच्चांटन करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ ते दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ दरम्यान संयुक्त सक्रिय कुष्ठरोग व क्षयरोग शोध मोहिमेत जनजागृतीसाठी घरोघरी आरोग्य तपासणी आणि क्षयरोग व कुष्ठरोगाच्या नवीन रुग्णांची शोध मोहिम राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेत एकूण १०८ नवीन कुष्ठरोगांची व २४८ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून, यामध्ये १६ बाल कुष्ठरुग्ण आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात माहे सप्टेंबर, २०२२ ते माहे ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत कुष्ठरोग व क्षयरोग मोहिम राबविण्यात आली होती. सदर मोहिमेमध्ये १५ व्यक्तींना कुष्ठरोग झाल्याचे आढळून आले आहे.

कुष्ठरोग व क्षयरोग आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत घरोघरी सर्वेक्षण, आरोग्य शिक्षण, मोफत निदान, संशयित रुग्णांचे निदान झाल्यानंतर त्वरीत मोफत उपचार देण्यात येत आहेत.

(३) कुष्ठरोग व क्षयरोग आजारावर नियंत्रण तसेच त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

- राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दरवर्षी कुष्ठरोग मोहिम, सक्रिय कुष्ठरोग शोध मोहिम व क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात येते.
- कुष्ठरोग व क्षयरोग यांच्याबद्दल समाजामध्ये असलेली भीती व गैरसमज दूर करण्यासाठी वर्षभर आरोग्य शिक्षणपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.
- क्षयरुग्णांकरिता सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, सर्वसाधारण रुग्णालये, दवाखाने व आरोग्य केंद्रांद्वारे क्षयरुग्णांकरिता निदान, उपचार, प्रतिकूल औषधांवरील उपचार, क्षयरुग्णांच्या जवळच्या व्यक्तींची वेळोवेळी तपासणी या सर्व सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खैरगांव (ता.इगतपूरी, जि. नाशिक) येथून जाणाऱ्या समृध्दी महामार्गामुळे बागायती शेतीचे झालेले नुकसान

**(१६) * ५३२६५ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खैरगांव (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथून जाणाऱ्या समृध्दी महामार्गामुळे बागायती शेतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक जिल्ह्यातून जाणाऱ्या समृध्दी महामार्गाच्या दोन्ही बाजूने कंपाऊंड वॉल असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सर्विस रोड तयार करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे समृध्दी महामार्गामुळे नैसर्गिक जलस्त्रोत बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून राहते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मा.आ.श्री.हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य, इगतपूरी यांचे सदर विषयाबाबतचे पत्र मुख्यमंत्री सचिवालयास दिनांक २३.०८.२०२२ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) सदर पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, सदर मागणीची पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागार यांच्याकडे सदर सर्व्हिसरोड बाबत शक्यशक्यता (Feasibility) पडताळणी करण्यात येत आहे. तांत्रिक सल्लागारांकडुन अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) सदर बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करुन आर्थिक मोबदला देण्याबाबत**

**(१७)** * **४९५२२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील शिरुड पाणीसाठा प्रकल्पामुळे विना-अधिग्रहीत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतात पाणी शिरल्यामुळे शिरुर, पिंपळगाव (हाते) व अल्लीपुर या गावांतील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची परिस्थिती ओढवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देऊन सर्व शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करुन शासनाच्या निकषानुसार त्यांना आर्थिक मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय अंशत: खरे आहे. दि.१७/७/२०२२ व १८/७/२०२२ दरम्यान अंदाजे १६ तासात १९०.५० मी.मी.पाऊस झाला. या अतिवृष्टीमुळे धरणातील पाणी पातळी २३५.७०० मी. म्हणजे धरणाच्या पूरपातळी २३५.४५ मी. पेक्षा जास्त होती. त्यानंतर पुढील काही दिवस प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीवर पाणी असल्याने पिकांचे अंशतः नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) शिरुड प्रकल्पाअंतर्गत पूर्ण संचय पातळी मधील भूसंपादन प्रक्रीया पूर्ण होवून शेतकऱ्यांना नियमानुसार मोबदला देण्यात आलेला आहे. प्रकल्पांची पूर्ण संचय पातळी (FTL)+१/२ पूर उचल पातळी मधील भूसंपादन शासन निर्णय दि.१७/२/२०२१ नुसार तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार विस्तृत सर्व्हेक्षण करुन शेतकऱ्यांच्या शेतजमीनी अधिग्रहीत करुन शासनाच्या निकषानुसार त्यांना आर्थिक मोबदला देण्यात येईल.
(४) प्रकल्पांचा शिरुड लपा प्रकल्प ता.हिंगणघाट जि.वर्धा तृतीय सुप्रमा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सचिव स्तरावरील उपसमिती समोर मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रालगत पावसाचे पाणी साचून असल्यामुळे लगतच्या भागात चिखल झाल्यामुळे सदर सर्व्हेक्षण करणे शक्य झाले नाही.

-----------------

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(१८) * ५०३४० श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यात माहे जानेवारी व फेब्रुवारी २०२१ या कालावधीत मोठ्या प्रमाणात गारपीट व अवकाळी पाऊस होऊन द्राक्ष, कांदा, मका, गहू, भाजीपाला व इतर शेतीपिकांचे नुकसान झालेले आहे. परंतु अद्यापही या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून विशेषतः नाशिक जिल्ह्यात मदत प्राप्त झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय सीएलएस २०२१/प्र.क्र.६६/म-३ नुसार माहे जानेवारी व फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील नुकसान भरपाई नाशिक महसुली विभागास अदा केलेली आहे. तसेच शासन निर्णय सीएलएस २०२१/प्र.क्र.१२१/म-३ व शासन निर्णय सीएलएस २०२१/प्र.क्र.२०३/म-३ नुसार माहे मार्च, एप्रिल, मे व माहे जुलै, २०२१ या कालावधीतील नुकसानीची नुकसान भरपाई शासनाने अदा केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ नाशिक जिल्ह्यातील माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ या कालावधीतील नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना मात्र अदा केलेली नसल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरहू नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करावी, याकरीता माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नुकसान भरपाईची रक्कम तातडीने अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

(२) खरे आहे,

(३) व (४) अंशत: खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधीनी निवेदनाव्दारे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली हे खरे आहे. तथापि शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.११.०८.२०२१ अन्वये माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत गारपीट व अवेळी पावसामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता सर्व विभागीय आयुक्तांना रू.४७८३.५२ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून, सदर निधीपैकी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या मागणीनुसार नाशिक जिल्हयाला रू.३०२.९८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील जीन्स कारखाने कल्याण खाडी किनाऱ्यांवर स्थापित झाल्याने नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याबाबत

**(१९) * ५२१३७ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रसिद्ध जीन्स कारखान्यावर बंदी घालण्यात आल्याने सर्व जीन्स कारखाने कल्याण खाडी किनाऱ्यांवर स्थापित होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यांमधून कोणतीही प्रक्रिया न करता मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी खाडीत सोडल्यामुळे प्रदूषित पाण्याचा परिणाम खाडीतील जलचर व वनस्पतींवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) याबाबतची तक्रार सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नाही.
(३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०१/१२/२०२२ व दिनांक ०२/१२/२०२२ रोजी कल्याण खाडी किनारी केलेल्या पाहणीदरम्यान ४ जीन्स वॉश उद्योग अनधिकृत सुरु असल्याचे आढळून आले होते. त्यानुषंगाने सदर उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०५/१२/२०२२ रोजी उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर दीक्षा भूमी (नागपूर) आराखडा मंजूरीबाबत

**(२०) * ५०४८८ श्री.अजित पवार (बारामती), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील दीक्षाभूमीच्या रु.३५० कोटीच्या मंजूर विकास आराखड्यातील रु.४० कोटी रुपयांचा निधी प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी सन २०१५ मध्ये दीक्षाभुमिच्या विस्तारीकरणाकरिता निधी देण्याची घोषणा केली होती व पहिल्या टप्प्यात रु.१०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन त्यापैकी रु. ४० कोटी निधी नागपूर सुधार प्रन्यासकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आराखड्यात दुरुस्ती करण्यात आली असून तो शासन स्तरावर प्रलंबित असून आता रु.१०० कोटी रुपयांचा आराखडा रु.१८० कोटी रुपयांवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुंषगाने दीक्षाभूमीच्या विस्तारीकरणाकरिता वाढीव निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
नागपूर येथील दीक्षाभूमीच्या विकास कामांकरीता रू.१००.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून यापैकी रू.४०.०० कोटी इतका निधी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.
दीक्षाभूमी नागपूर येथील विविध विकास काम करण्याकरीताचा रू.१९०.११ कोटी इतक्या रकमेचा विकास आराखडा शासनास प्राप्त झालेला आहे.
(४) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दि.३.३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता. सदरील प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर दि.२१.१०.२०२२ रोजी सादर करण्यात आला होता. उच्चस्तरीय सचिव समितीने सध्या प्रस्तावित करण्यात आलेल्या विविध विकास कामांपैकी, संरक्षक भिंत वगळून, अन्य सर्व प्रस्तावित बाबींचा फेरविचार करून, तसेच पोलीस विभागाच्या गरजा/अडचणी विचारात घेऊन, आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. परिक्रमा मार्गासाठी नागपूरचे तापमान विचारात घेऊन, त्याच्याशी सुसंगत या

सुधारणा करताना अस्तित्वात असलेल्या स्तूपाची भव्यता अबाधित ठेवण्यात येऊन, अनावश्यक बांधकाम टाळून, आवश्यकतेनुसार सुधारित आराखडा फेरसादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.२५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या सूचनेस अनुसरून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव पुनश्च सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उच्च स्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बोरीवली (पश्चिम) येथील गोराई, उत्तन, मनोरी या परिसरात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२१) * ४९४५३ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली (पश्चिम) येथील खाडीपलीकडील गोराई, उत्तन, मनोरी हे परिसर मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येवूनही तेथे पाणीपुरवठा, रुग्णालय, प्रसुतिगृह, पथदिवे आदि विविध नागरी सुविधांची कमतरता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोराई कोळीवाडयातील नागरिकांना पाणी पुरवठ्याअभावी टँकर किंवा बोअरवेलचे पाणी वापरावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच गोराई गावातील काही रस्ते सुस्थितित असतानाही त्याचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त संपूर्ण प्रकरणी सखोल चौकशी करुन सदरहू गोराई, उत्तन, मनोरी या परिसरात विनाविलंब नागरी सुविधा पुरविण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बोरीवली (प.) येथील खाडीपलीकडील गोराई व मनोरी परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत:-

- सदर परिसरात स्थानिक नागरिकांच्या गरजेनुसार नागरी सुविधेंतर्गत पायवाट बनविण्याचे काम वेळोवेळी उपलब्ध निधीप्रमाणे करण्यात येते.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर पथदिवे बसविण्यात आले आहेत.
- सदर ठिकाणच्या गावांना लिबर्टी गार्डन टनेल-मालाड-मार्वे मार्गे पाणी पुरवठा केला जातो. त्याकरिता मार्वे जेट्टीहून खाडीतून जलवाहिनी टाकण्यात आली असून, खाडीपलीकडे मनोरी गावामार्गे टनेलपासून अंदाजे १२ कि.मी. अंतराहून सदर पाणी पुरवठा केला जात आहे.
- सदर अंतर जास्त असल्यामुळे एअर ट्रॅपच्या समस्येमुळे गोराई भागातील काही गावांस कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. याकरिता तेथील नागरिकांना दिलासा देण्याकरिता मागणीनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच, सदर पाणी पुरवठा सुधारण्यासाठी सातत्याने एअर ब्लो करणे व गळती थांबविणे यासारखी कामे करुन पाणी पुरवठा सुरळीत राखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
- गोराई गांव येथील मार्केटजवळ शोषण टाकी व उदंचन केंद्र बांधून जलवाहिन्या टाकण्याची कामे प्रस्तावित केली आहेत. तथापि, सदर जागा कांदळवन क्षेत्रात येत असल्याने सदर जागेवर प्रस्तावित प्रकल्पास परवानगी मिळण्याकरिता मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. मा.न्यायालयाची मंजुरी मिळाल्यानंतर सदर काम तातडीने पूर्ण करण्यात येणार आहे.

- गोराई गाव येथील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याकरिता बोरीवली (प.) येथून गोराई खाडीमार्गे स्वतंत्र जलवाहिनी टाकून बोरीवली येथील महावीर जगर टनेलमधून पाणी पुरवठा करता येईल किंवा नाही याबाबतची शक्याशक्यता तपासण्यात येत आहे.
- गोराई गावातील गोराई गांव मुख्य रस्ता (उत्तन गाव ते मनोरी पर्यंत), गोराई जेट्टी रस्ता (जेट्टी ते गोराई क्रॉस चौक) व जामझाड पाडा रस्ता (गोराई मुख्य रस्ता ते जामझाडपाडा गांव) या खराब झालेल्या तीन रस्त्यांच्या सुधारणीकरणाची कामे विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार हाती घेण्यात आली आहेत.
- गोराई गावामध्ये गोराई गाव दवाखाना सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कार्यरत असून, या दवाखान्यामार्फत प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. तसेच, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सक्षमीकरण योजनेंतर्गत सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पॉलिक्लिनिक व दुपारी ३ ते रात्री १० वाजेपर्यंत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना जनतेला प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी दुसऱ्या सत्रात सुरु करण्यात येणार आहे. गोराई गाव आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण तसेच इतर आरोग्य विषयक सुविधा व सर्व शासकीय आरोग्य कार्यक्रमासंबंधी सुविधा पुरविल्या जातात.
- मनोरी गावामध्ये मनोरी दवाखान्यात सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत प्राथमिक सुविधा तसेच, दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सक्षमीकरण योजनेंतर्गत एच.बी.टी. क्लिनिकद्वारे प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. मनोरी परिसरात लेहर आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण, इतर आरोग्य विषयक सुविधा तसेच सर्व शासकीय आरोग्य कार्यक्रमासंबंधी सुविधा पुरविल्या जातात. त्याचप्रमाणे मढ विभागामध्ये रुग्णालयासाठी भूखंड आरक्षित असून, रुग्णालय प्रस्तावित आहे.
- विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार गोराईतील मनोरी विभागातील रस्ते दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

उत्तन परिसरात मीरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत:-

- उत्तन रस्ता (टप्पा-२) अंतर्गत मोर्वा-डोंगरी ते उत्तन या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम करण्यात येत असून, ३५% काम पूर्ण झाले आहे. उत्तन परिसरातील मुख्य रस्ते व पायवाटांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येऊन सदर रस्ते सुस्थितीत आहेत.
- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. अदानी लि., मे. टाटा पॉवर कंपनी व मे. एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेमार्फत वीज पुरवठा करण्यात येत असून, उत्तन परिसरात विविध रस्त्यांवर मे. अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई यांचेमार्फत एकूण १७४४ पथदिवे बसविण्यात आले असून, त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असते.
- उत्तन परिसरातील गावांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असून, सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे. तसेच, ज्याठिकाणी जलवाहिनी टाकणे शक्य नाही त्या परिसरातील नागरिकांना विंधन विहीर व टँकरमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
- उत्तन कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे १ नागरी आरोग्य केंद्र व २ उपकेंद्र (मुर्धा व मोर्वा) कार्यरत आहेत. सदर नागरी आरोग्य केंद्र व उपकेंद्रामार्फत महिला व नागरिकांसाठी भाईंदर येथे २०० खाटांचे पंडित भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय हे शासकीय रुग्णालय उपलब्ध आहे. सदर ठिकाणी प्रसुतीसेवा तसेच मेडिकल, सर्जिकल व निदानात्मक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत.
- उत्तन गावातील गरोदर माता व इतर रुग्णांना रुग्णालयात जाण्याकरिता महानगरपालिकेची तसेच, १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध आहे.
- उत्तन कार्यक्षेत्रात चौक येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आले असून, ते लवकरच सुरु करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भीवगाव शिवारातील (ता.देऊळगाव, जि.बुलढाणा)**
**सिंचन विभागाचा पाझर तलाव फुटल्याबाबत**

**(२२) * ५१३२९ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील गिरोली (बु.), निमखेड, भीवगाव शिवारातील सिंचन विभागाचा पाझर तलाव संततधार पावसामुळे फुटून परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पाझर तलावाची सत्वर दुरुस्ती करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे गिरोली बु.ता.देउळगाव राजा जि.बुलढाणा येथील पाझर तलाव क्र.०१ पावसाळयामध्ये पूर्ण क्षमतेने भरलेला होता व सांडव्यातून विसर्ग सुरू होता. परंतु संततधार पाउस व दिनांक ०६/०९/२०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पाणी पातळी वाढून तलावाच्या भिंतीला भगदाड पडले व त्या भगदाडाव्दारे पाण्याचा विसर्ग सुरू झाला.

(२) नाही. हे खरे नाही.

(३) होय.

सदर पाझर तलाव दुरूस्तीच्या रू.४४,७६,९००/-किंमतीच्या अंदाजपत्रकाची तांत्रिक तपासणी करून मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत प्रशासकिय मान्यतेसाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती यांस सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याठी रू.५.६८ लक्ष किंमतीचा निधी मागणी पत्र जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग, बुलढाणा यांचेमार्फत मा.सचिव,ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांचेकडे विहित प्रपत्रांसह सादर करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील समाजकल्याण विभागांर्तगत येणाऱ्या शासकिय वसतिगृहात**
**गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत**

**(२३) * ४९४४३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड),**

**श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समाजकल्याण विभागांर्तगत ४४१ शासकिय वसतिगृहे असून जवळपास ५० हजारांहून अधिक गरीब व गरजू विद्यार्थी वसतिगृहामध्ये शिक्षण घेत असुन त्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर समाजकल्याण विभागाकडून अचानक ५४ वसतिगृहाध्ये धाडी टाकण्यात आल्या त्यात वसतिगृहाच्या कामकाजात आणि इतर बाबीत अनियमितता असल्याचे निदर्शनास आले असून ५० टक्के वसतिगृहामध्ये गृहपाल राहत नसल्याची तसेच मुलींच्या वसतिगृहामध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित नसून काही वसतिगृहांत पिण्याचे पाणी तसेच ग्रंथालयाची सोयही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहाच्या नोंदवहीत नोंद असूनही विदयार्थी वसतिगृहात नाहीत तर काही ठिकाणी मान्य संख्येच्या केवळ १० ते २० टक्केच विदयार्थी उपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील शासकिय वसतिगृहांमध्ये आवश्यक सोईसुविधा पुरविण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) याबाबत ५४ शासकीय वसतिगृहांची अन्य जिल्ह्यांच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्यामार्फत वरीष्ठ समाज कल्याण निरीक्षक, लेखा विषयक कामकाज करणारे अधिकारी/कर्मचारी, आस्थापनाविषयक कामकाज करणारे कर्मचारी यांच्या पथकासह अचानक तपासणी करण्यात येऊन सबंधित ४९ शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांना आयुक्तालयामार्फत कारणे दाखवा बजावून चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, क्षेत्रीय कार्यालयाच्या मागणीनुसार शासकीय वसतिगृहामध्ये आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबतचे आदेश समाज कल्याण आयुक्तालयामार्फत देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) एमआयडीसीतील सात कंपन्यांनी पर्यावरण अटींचे उल्लंघन केल्याबाबत

**(२४) * ५०१०८ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) एमआयडीसीतील सात कंपन्यांना विषारी वायुने प्रदुषण केल्याप्रकरणी प्रदुषण नियंत्रण मंडळाने नोटीस दिल्याची बाब माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाटाव एमआयडीसीतील अनेक कंपन्या पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत असतानाही केवळ सात कंपन्यांनाच नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपन्याच्या वायू प्रदुषणामुळे धाटाव, रोठ, तळाघर, निवी, वरसे, रोहा या गावातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कारखान्यांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

या औदयोगिक क्षेत्रातील एका उदयोगास दि.०८.०९.२०२२ रोजी उत्पादन बंद करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेले आहेत. तसेच, ६ उदयोगांना हवा प्रदुषण सनियंत्रण यंत्रणा शास्त्रोक्त पध्दतीने कार्यान्वीत ठेवण्यासाठी दि. १७.०९.२०२२ रोजीच्या पत्रांद्वारे कळविण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, या औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात येते. तसेच, पाहणी दरम्यान दोषी आढळणाऱ्या उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार धाटाव औद्योगिक वसाहतीतील उद्योगांमुळे धाटाव, रोठ, तळाघर, निवी, वरसे व रोहा या गावातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, धाटाव उपकेंद्र व परिसरातील आरोग्यास धोका निर्माण झालेला एकही रुग्ण उपचारासाठी प्राथमिक आराग्य केंद्रात किंवा उपकेंद्रात आलेला नसल्याचे नमूद केले आहे.

(४) रोहा औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात दररोज निघणाऱ्या १२०० मॅट्रिक टन कचऱ्यावरील प्रक्रियेबाबत

**(२५) * ५१५७९ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) शहरातून दररोज १२०० मॅट्रिक टन निघणारा कचरा भांडेवाडी यार्डात साठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी नेदरलँड येथील कंपनी गुंतवणूक करण्यास तयार असतानाही नागपूर महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होऊ शकली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) नागपूर महानगरपालिकेमार्फत १२०० मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता आंतरराष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात आल्या यामध्ये M/s SusBDe Holding B.V. (JV) यांची उचत्तम आर्थिक निविदा (Zero Tipping fees with Annual Royalty to NMC) स्विकारण्यात आली असून लेटर ऑफ इंन्टेट दि.०६.१०.२०२२ रोजी

देण्यात आले आहे. निविदेतील अटी व शर्तींनुसार या कंपनीने एस पी व्ही दि.२८.११.२०२२ रोजी स्थापन केली असून करारनाम्यानुसार इतर अटींची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे. निविदेच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही दिरंगाई झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरण, रिक्त पदे तसेच पिडीयाट्रीय वॉर्ड सुरु करण्याबाबत**

**(२६) * ४९९८५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील क्षयरुग्णांसाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या या रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरणाचे काम गत २ वर्षापासून प्रलंबित असल्याने तेथे एकाही रुग्णावर शस्त्रक्रिया होवू शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षयरोग रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरणाच्या कामास विलंब होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची ४० टक्के पदे रिक्त असल्याने रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले असून, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव रुग्णालय प्रशासनाने वरिष्ठांकडे पाठवूनही अनेक महिन्यांपासून त्यांची नियुक्ती प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त रुग्णालयात बालरोगतज्ञ नसल्याची बाब दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्णालयात "पिडीयाट्रीय वॉर्ड" सुरु करण्याबाबत रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुंबईतील क्षयरोग रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरण, रिक्त असलेली पदे भरणे व पिडीयाट्रीय वॉर्ड सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे ९०% काम पूर्ण झाले असून, पुढील २ ते ३ महिन्यांमध्ये उर्वरित काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर नव्या शस्त्रक्रियागारात मोठ्या शस्त्रक्रिया सुरु होणार आहेत.

तथापि, सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेल्या लघु शस्त्रक्रियागारामध्ये छोट्या शस्त्रक्रिया सुरु आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर क्षयरोग रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरणाचे काम सुरु झाल्यानंतर कोविड-१९ चा प्रादुर्भाव झाल्यामुळे शस्त्रक्रिया विभागाशी संलग्न कामांच्या निविदा काढण्यासाठी विहित कालावधीपेक्षा अधिक कालावधी लागला.

तथापि संलग्नित कामांपैकी जवळपास ९०% कामे पूर्ण झाली आहेत. सद्य:स्थितीत उर्वरित कामांची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर शस्त्रक्रियागारामध्ये इतर आवश्यक सुविधा अंतर्भूत करण्यात आल्या असून, सदर कामे वेगवेगळया यंत्रणांकडून करावयाची असल्याने शस्त्रक्रिया विभागाच्या नुतनीकरणाच्या कामास विलंब होत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची ४० टक्के पदेरिक्त आहेत. तसेच, मागील ३ ते ४ वर्षे सदर रुग्णालयातील दुरुस्तीच्या कामांमुळे १०२४ खाटांऐवजी ५४१ खाटा कार्यरत आहेत. सदर रुग्णालय ५०% क्षमतेने सुरु असल्यामुळे कार्यरत कर्मचारी सदर रुग्णालयीन सेवेसाठी सद्य:स्थितीत पुरेसे आहेत,

सदर रुग्णालयाच्या आस्थापनेवर ४४ वैद्यकीय अधिकारी पदे असून, त्यापैकी २० पदांवर वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत व रिक्त २४ पदांवर गरजेनुसार कंत्राटी वैद्यकीय अधिकारी घेण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर क्षयरोग रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागाचे नुतनीकरण, पिडीयाट्रीय वॉर्ड सुरु करण्याबाबत व रिक्त पदे भरण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- थ्री फेज सप्लाय, एमजीपीएस लाईन, स्क्रब एरिया, रुग्णांसाठी रिकव्हरी रुम, डॉक्टर रुम, नर्सेस रुम, कामगार खोली इत्यादी शस्त्रक्रिया कक्षाशी संलग्न कामे वापरकर्ता विभागाच्या मागणीनुसार विविध यंत्रणांकडून करुन घेण्यात आली आहेत.
- बालक्षयरोग कक्षासाठी प्रस्तावित असलेला कक्ष सन २०१९ पासून दुरुस्तीसाठी बंद आहे. सद्य:स्थितीत आरोग्य पायाभूत सुविधा कक्ष विभागामार्फत सदर कक्षाचे ९०% काम पूर्ण झाले असून, सदर कक्ष लवकरात लवकर सुरु करण्यात येणार आहे.
- विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (बालक्षयरोग तज्ञ) पद भरण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
- २४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याकरिता पुढील कार्यवाही सुरु आहे.
- परिचारीका संवर्गातील बिंदुनामावली पडताळणीची कार्यवाही पूर्ण झाली असून, रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
- पॅरामेडिकल संवर्गातील औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ इ. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विलेपार्ले येथील विविध ठिकाणी सुरु असलेल्या मेट्रोच्या कामामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(२७) * ५३८१६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले येथील विविध ठिकाणी मेट्रोची कामे सुरू असून कामांमध्ये होणाऱ्या दिरंगाईमुळे नागरिकांची व रुग्णांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एअरपोर्ट कॉलनी, विलेपार्ले (पूर्व) येथे नेमलेल्या उपकंत्राटदाराने काम अपुर्णावस्थेत सोडल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलेपार्ले, एस.व्ही. रोड येथील नानावटी रुग्णालयाजवळील मेट्रोचे काम बंद असूनही वाहतुकीसाठी संपुर्ण रस्त्यांची रुंदी उपलब्ध होऊ शकत नसल्याने तसेच रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहतूक कोंडी होऊन रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त समस्यांचे निराकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

एस. व्ही. रोड, विलेपार्ले येथे मेट्रो मार्ग २-ब प्रकल्पाचे काम सुरु आहे व पश्चिम द्रुतगती मार्गाच्या एअरपोर्ट कॉलनी जवळील सेवा रस्त्यावर मेट्रो मार्ग ७-अ या प्रकल्पाचे काम सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

मेट्रो मार्ग ७-अ प्रकल्पाच्या ३७० मीटर व्हायाडक्टकरीता लावण्यात आलेले बॅरिकेडस् दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी पूर्णत: हटविण्यात आले आहेत.
(३), (४) व (५) एस.व्ही. रोडवर नानावटीजवळ जुहू एअरपोर्ट फनेल झोनमधील १४० मी लांबी वगळून मेट्रो मार्ग-२ ब प्रकल्पाचे काम सुरु आहे. सद्य:स्थितीत मेट्रोच्या बांधकामासाठी उभारलेल्या बॅरिकेडस् लगतच्या रस्त्याची दुरुस्ती करुन वाहतूक सुरळीत ठेवण्याची खबरदारी घेण्यात येत आहे.

मेट्रो मार्ग-२ ब प्रकल्पातील खांबाच्या (पिअर्स) पायाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करुन, बॅरिकेडस् हलवून वाहतूकीस रस्त्याची जास्तीत जास्त रुंदी उपलब्ध करणेबाबतच्या सूचना कंत्राटदारास देण्यात आहेत. बांधकामादरम्यान प्रकल्पाच्या लांबीतील वाहतूक पोलिस चौक्यांना वाहतूक नियंत्रक पुरविण्यात येत असून या लांबीतील वाहतूक सुरळीत ठेवण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

### राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२८)** * **५००१७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे जानेवारी ते ऑगस्ट, २०२२ या कालावधीत सुमारे १८७५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे सन २०१५ नंतर सुमारे १५००० शेतकरी महिला विधवा असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी विधवा महिलांसाठी शासकीय पेन्शन योजना असून त्याची अद्याप अंमलबजावणी होत नसल्याचेही दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी केवळ २६ टक्केच महिला या पेन्शनसाठी अर्ज करू शकल्या असून त्यापैकी ४७ टक्के महिलांनाच पेन्शन लागू झाल्याचे मकान किसान अधिकारी मंच या संस्थेने केलेल्या संशोधनातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच या महिलांना स्वतंत्र रेशनकार्डची मुभा असूनही फक्त ३४ टक्के आत्महत्याग्रस्त महिलांचे नाव अद्यापही स्वतंत्र रेशनकार्डवर नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, यासंदर्भात ६५ टक्के विधवा महिलांचे पारिवारीक स्तरावरील संपत्ती, घर, शेतजमीनीचे हक्क देखील डावलल्यामुळे प्रतिकूल व हलाखीचे जीवन जगणाऱ्या शेतकरी विधवा महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी तसेच शासकीय पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) राज्यात माहे जानेवारी ते ऑगस्ट, २०२२ या कालावधीत सुमारे १८७५ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत.
(२), (३), (४) व (५) विभागामार्फत दारीद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असलेल्या किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, पक्षाघात, प्रमस्तीष्कघात, एड्स, कुष्ठरोग, यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू

न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत दरमहा रुपये १०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच सदरहू योजनेतील १ अपत्य असलेल्या विधवांना दरमहा रु.११००/- तर २ अपत्य असलेल्या विधवांना रु. १२००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना मदत करण्याबाबत विविध योजना राबविण्यात येतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड नगरपरिषदेअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेत केलेल्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२९) * ५२४४५ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेअंतर्गत राखीव प्रभागामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने विद्युत पोलसहित एलईडी (LED) चे काम करण्याबाबत दिनांक २३ जून, २०२२ रोजी आदेशित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशामधील निर्णय क्र.२ मध्ये ज्या कार्यान्वित यंत्रणांकडून कामे करण्यात येतील त्या यंत्रणांना मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनीकडून कामे सुचविण्याबाबत व संबंधित यंत्रणांनी ती कामे करण्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार दिनांक १४ जुलै, २०२२ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर सदर कामास दिलेली ना-हरकत व देखभाल दुरुस्तीची मान्यता रद्द समजण्यात यावी, असे आदेश मा.मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड यांनी माहे जुलै, २०२२ मध्ये दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कामे पुर्ण करावीत असे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदय तसेच मा. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांना दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्र-निवेदनाद्वारे मागणी करुनही अद्याप कामे सुरु करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याबाबत दि.०६.०७.२०२२ रोजी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, बीड यांना कळविले आहे. तद्‌नंतर सदर कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, बीड यांनी दि.१४.०७.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(४) व (५) सदर निवेदन प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने सदर प्रकरणी तपासून अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टी, महापूर व परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(३०) * ४९४९३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.राहूल पाटील (परभणी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भासह राज्यात अतिवृष्टी, महापुर, वादळी वारे व ढगफुटीसदृश्य पाऊस अशा विविध नैसर्गिक आपत्तीमुळे जिवितहानी, शेतकऱ्यांच्या जनावरांचे, पिकांचे, शेतीचे, फळबागांचे आणि स्थावर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांश जिल्ह्यात नुकसानग्रस्त विभागातील पंचनामे करण्याचे काम अद्यापही प्रलंबित असून अनेक ठिकाणी हे पंचनामे सदोष असून पंचनाम्याच्या वस्तुनिष्ठ अहवालाअभावी अनेक पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर जिल्हयातील पंचनामे हे कृषी व महसूल विभागाच्या वतीने केले जात असताना संबंधित कर्मचारी हे खाजगी एजंट नेमून त्यांच्याकडून पंचनामे करीत असून संबंधित एजंट शेतकऱ्यांकडून एकरी चारशे रुपये सक्तीने वसूल करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसान भरपाईचा निधी प्रत्येक जिल्हयांकडे वळती होऊनही केवळ लाखो शेतकऱ्यांची यादी प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याची तसेच सदरहू नुकसानीची मदत ही एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मिळाली नसुन प्रशासनाकडून सदरहू पीकांची आणेवारीही कमी दाखविण्यात आल्यामुळे अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करुन नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेता व लोकप्रतिनिधी यांच्याकडून लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओला दुष्काळ जाहिर करुन नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी व वस्तुनिष्ठ पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करण्यासह यातील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.
(२) खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.

नेवासा तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासंदर्भात प्रसारीत झालेल्या व्हिडीयो किल्पमध्ये पैसे मागितल्याचे निदर्शनास आले आहे. श्रीरामपूर व राहुरी तालुक्यामध्ये खाजगी एजंटव्दारे पंचनामे केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, पंचनाम्याच्या अनुषंगाने तक्रारीचे वृत्त दि.२.११.२०२२ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे.
(४) खरे नाही.
(५) खरे आहे.
(६) केंद्र शासनाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये "ओला दुष्काळ" असा शब्द प्रयोग आढळून येत नाही. चालू हंगामामध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांचे विहित कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी यांच्याकडील यंत्रणेमार्फत पंचनामे पूर्ण झालेले आहेत. आतापर्यंत चालू हंगामामधील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता रू.५४३९.०७ कोटी इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. नेवासा, श्रीरामपूर व राहुरी या तालुक्यातील पंचनाम्यासंदर्भात ज्या कर्मचाऱ्यांविरूध्द तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या त्या कर्मचाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दादर (मुंबई) येथील छबिलदास शाळेत सिलेंडरचा झालेला स्फोट

**(३१) * ५४२३६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथील छबिलदास इंग्लिश शाळेच्या गच्चीवर झालेल्या गॅसच्या स्फोटात शाळेच्या उपहारगृहातील तीन कर्मचारी जखमी झाले असल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळेला दिवाळीची सुट्टी असल्याने मोठी दुर्घटना टळली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईत सातत्याने होत असलेल्या सिलेंडर स्फोटाचा प्रश्न ऐरणीवर आला असून उक्त प्रकरणी बेकायदा सिलेंडरचा साठा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत छबिलदास शाळेस निरीक्षण अहवाल देण्यात आला असून, त्यांचेविरुध्द महानगर दंडाधिकारी, ४१ वे न्यायालय, दादर शिंदेवाडी येथे मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ चे कलम ३९४(४) अंतर्गत खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर कॅम्प नं.५ (जि.ठाणे) परिसरातील "मानस" टॉवर इमारतीचा स्लॅब कोसळून झालेला अपघात**

**(३२) * ५०७०३ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर कॅम्प नं.५ परिसरातील "मानस" टॉवर इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यु झाल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारत दुर्घटनेनंतर उल्हासनगर महानगरपालिकेचे मा.आयुक्त तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देऊन पाहणी केली असल्याचे तसेच सदर इमारतीच्या स्ट्रक्चर ऑडीटची नोटीस दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय

(३) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अपघातातील मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६.०९.२०२२ रोजी चौकशी समिती स्थापन करण्यात आली.

त्यानुसार, "मानस टॉवर" ही इमारत उल्हासनगर महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या धोकादायक इमारतीच्या यादीत समाविष्ट नव्हती. तथापि सदर इमारतीमधील रहिवाशांना उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २४.०५.२०२१ व दिनांक २२.०७.२०२२ रोजी नोटीस बजावून इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यासाठी सूचित करण्यात आले होते. त्यानुसार इमारतीमधील रहिवाशांनी इमारतीची संरचनात्मक तपासणी करुन नियमानुसार इमारतीची दुरुस्ती करुन इमारत सुस्थितीत असल्याबाबत अहवाल सादर करणे आवश्यक होते. तथापि इमारतीच्या रहिवाशांनी इमारतीची संरचनात्मक तपासणी विहित मुदतीत केली नव्हती. त्यामुळे सदर दुर्घटना घडण्यास इमारतीमधील रहिवाशी प्रथमदर्शनी जबाबदार आहेत, असा अहवाल चौकशी समितीने सादर केला आहे.

सदर अहवालास अनुसरुन इमारतीमधील रहिवाशांना नोटीस बजावून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

तसेच, दुर्घटनेतील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अहवालामध्ये सदर इमारत अधिकृत असल्याबाबत कोणताही उल्लेख नाही. तसेच सदर इमारतीस स्थानिक प्राधिकरणाकडून खाली करण्याबाबत नोटीस दिल्याचे दिसून येत नाही. सबब शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १९.०७.२०१८ मधील तरतूदींची पूर्तता होत असल्यास शासनाकडून मदत अनुज्ञेय करण्यात येते, असे महसूल व वन विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कांदा पिकाचा "बाजार हस्तक्षेप योजनेत" समावेश करण्याबाबत**

**(३३) * ४९४८७ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कांदा पिकाला अपेक्षित दर मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचे माहे एप्रिल, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांद्याच्या दराबाबत धोरण तयार करण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नाशवंत पिकांना संरक्षण देण्यासाठी, केंद्र शासनाने बाजार हस्तक्षेप योजना सुरु केली असून त्यामध्ये सफरचंद, लसूण, द्राक्ष, मोसंबी व मशरुम इ. पिकांचा समावेश करुन, कांदा पिकांचा बाजार हस्तक्षेप योजनेत करावा अशी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कांद्याला प्रतिक्विंटल १००० रुपये अनुदान देवून मनरेगा योजनेत कांदा हे पिक समाविष्ट करुन कांदा लागवड ते काढणीपर्यंत मजुरीचा खर्च देण्यात यावा व नाफेडमार्फत कांदा विक्री चालू करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच कांदयाचे दर कोसळल्याने कांदा खरेदी नाफेडमार्फत करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १४ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केंद्रीय अन्न व सार्वजनिक पुरवठा मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या सर्वप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

राज्यात एप्रिल २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये काही बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर कमी झालेले आहेत. सदर कालावधीमध्ये कांद्याचा प्रती क्विंटल दर १०० ते ५०० रुपये होता व जास्तीत जास्त १६०० रूपये होता.
(२) मा.श्री.छगन भुजबळ, विधानसभा सदस्य यांनी कांदा बाजारभावातील घसरण थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत दिनांक २२/७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास विनंती केलेली आहे.

(३) बाजार हस्तक्षेप योजना फळेवर्गीय पिकांसाठी राज्यशासनाच्या विनंतीवरून राबविण्यात येते. यापूर्वी राज्यशासनाने १९८९-९० व १९९९-२००० मध्ये कांद्यासाठी बाजार हस्तक्षेप योजना राबविली होती. तथापि, सदर योजनेंतर्गत राज्य शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यामुळे २००८ पासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यात्यावेळेच्या परिस्थितीनुसार अनुदान देण्यात येते. सन २०१६-१७ मध्ये रु.४१.३३ कोटी आणि सन २०१८-१९ मध्ये रु.५०४ कोटी इतके अनुदान वितरीत केले आहे.

(४) याबाबत दिनांक १३.०४.२०२२ च्या ॲग्रोवन, सकाळ या वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. मनरेगा योजना प्रामुख्याने रोजगार वाढीसाठी व निर्मितीसाठी राबविण्यात येते. कांदा पीक हे बहुवार्षिक नाही ते खरीप, लेट खरीप आणि रब्बी हंगामात घेतले जात असल्याने मनरेगा योजनेत कांदा पीकाचा समावेश नाही.

(५) व (६) सन २०२२ मध्ये किंमत स्थिरतानिधी योजनेंतर्गत नाफेडने कांदा खरेदीचे उद्दीष्ट २.१० लाख मे.टन निश्चित केले होते. एकूण २.३८ लाख मे.टन कांद्याची खरेदी केलेली आहे. राज्यात कांद्याचे घसरलेले बाजारभाव विचारात घेता, किंमत स्थिरता निधी अंतर्गत कांदा खरेदीसाठी अतिरिक्त २ लाख मे.टन अतिरिक्त उद्दिष्ट देऊन नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्याची केंद्र शासनास मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरून विनंती करण्यात आलेली आहे.

(RoDTEP) Remission Of Duties and Taxes on Export Products या योजनेंतर्गत निर्यात प्रोत्साहन वाढविण्यासाठी देण्यात येणारे २ % निर्यात प्रोत्साहन वाढवून १० % करण्यासाठी दिनांक २३ जून, २०२२ व दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरून विनंती करण्यात आली आहे.

तसेच केंद्रशासनाने फळे व भाजीपाला निर्यातीसाठीच्या वाहतूकीवरील दिलेली GST ची सूट दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ च्या पुढेही चालू ठेवण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरून दिनांक १०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आलेली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(३४) * ५०३२५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रमुख असलेल्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या १६ पैकी १० महत्त्वाच्या शहरातील जागा रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लायसन्स, परवाने वाटप यावर नियंत्रण ठेवणे, नवीन वाहन नोंदणी, वाहन तपासणी योग्यता प्रमाणपत्र, चेकपोस्टवर देखरेख ठेवणे तसेच वाहतूक मोडणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्या भरारी पथकाकडून कामगिरी करुन घेणे इत्यादी कामे रिक्त पदांमुळे प्रलंबित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

तथापि, ज्या कार्यालयातील प्रादेशिक परिवहन अधिकारी ही पदे रिक्त आहेत. तेथे अन्य अधिकाऱ्यांकडे प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून संबधित कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.

(३) प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेची बाब कार्यवाही खाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवसेंदिवस वाढत जाणारी पाणीटंचाईची समस्या सोडविण्याबाबत

**(३५) * ५००३२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवसेंदिवस वाढत जाणारी पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी ठाणे शहराला भातसा आणि बारवी धरणातून प्रत्येकी ५० दशलक्ष लिटर वाढीव पाणी देण्याचा निर्णय झालेला असतांनाही महानगरपालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात करार झालेला नसल्यामुळे शहरातील नागरीकांना वाढीव पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अशा प्रकारची तक्रार निदर्शनास आली आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक २०.०७.२०२२ अन्वये प्रदान मंजूरी नुसार भातसा धरणातून अतिरिक्त ५० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाणीपुरवठा उचलण्यात येत असून सदर पाण्याचे शुध्दीकरण करुन ठाणे शहराला पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. सदर अतिरिक्त वाढीव पाणीपुरवठ्याचा करारनामा करण्याची प्रक्रिया महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

बारवी धरणातून पाण्याचा कोटा थेट ठाणे महानगरपालिकेस देण्यासाठी तपासणी करणे व धरणाच्या वाढलेल्या उंचीच्या समप्रमाणात पाणीसाठा देणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १६.०७.२०२२ रोजीच्या बैठकीत निर्देश दिले आहेत. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जांभूळ जलशुध्दीकरण केंद्राचे विस्तारीकरण व इतर आनुषंगिक कामे पूर्ण झाल्यानंतर वाढीव ५० द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पूर्व) येथील शांताराम तलावाच्या सुशोभिकरणात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३६) * ४९४७५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पूर्व) कुरार पोलीस ठाणे लगत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या (शांताराम तलाव) सुशोभिकरण व सौंदर्यीकरणाच्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेतर्फे मंजूर करण्यात आलेल्या ७७ लाख ५८ हजार रुपये निधीपैकी केवळ १५ ते २० टक्के इतकाच निधी खर्च करण्यात येऊन उर्वरित निधी संबंधित अधिकारी व ठेकेदारांनी

अपहार करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उद्यान तलावाचे सुशोभिकरणाचे करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कामाची शासनातर्फे सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर कामामध्ये उद्यानाच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम, त्याची रंगरंगोटी, भित्तीचित्रे व मुख्य प्रवेशद्वार, त्याचे सौंदर्यीकरण, मुख्य प्रवेशद्वारासमोरील पदपथाचे सौंदर्यीकरण तसेच, वाचनालय व शौचालयाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. सदर काम महानगरपालिकेच्या विहित नियमानुसार समाधानकारक पूर्ण करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील गरीब विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकीत विद्यापीठे व शिक्षण संस्थांमधून उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करण्याबाबत

**(३७) * ५०२६५ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी परदेशातील नामांकित विद्यापीठे व शिक्षण संस्थामधून उच्च शिक्षण घेण्यासाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबतची सन २०२२-२०२३ ची जाहिरात प्रसिध्द झाली असून शिष्यवृत्तीसाठीच्या विद्यार्थी संख्येत तसेच त्यांच्या कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने निर्णय न घेतल्याने अनेक विद्यार्थी या लाभापासून वंचित राहणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गातील गरीब विद्यार्थ्यांपेक्षा श्रीमंत वर्गातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होत असून गरीब विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रवर्गातील परदेशी शिष्यवृत्तीची विद्यार्थी संख्या व त्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबतची मागणी संविधान फाऊंडेशन, नागपूर या संस्थेने शासनाकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या घेतलेल्या ऑनलाईन बैठकीदरम्यान विद्यार्थी संख्या व उत्पन्न मर्यादा वाढविण्याची घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेतंर्गत मागील पाच वर्षात एकूण किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली तसेच बार्टी संस्थेमार्फत सदर विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाकरिता किती निधीचे वाटप करण्यात आले आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुषागने अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी परदेशी शिष्यवृत्तीच्या विद्यार्थी संख्येत व त्यांच्या कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशंत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर योजनेअंतर्गत मागील पाच वर्षात एकुण ७५६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आली ज्यामध्ये दरवर्षी नव्याने निवड झालेले व नुतनीकरण (Renewal)
करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सदर योजना ही विभागाची स्वतंत्र योजना असुन सदर योजनेस बार्टी मार्फत निधी वाटप करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) मा.मंत्री (सा.न्या) यांनी दिनांक ०५.०८.२०२१ रोजी अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेत सुधारणा करणे (जागा वाढ)

या विषयासंदर्भात आयोजीत बैठकीत सदर योजनेअंतर्गत ५० जागा वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले होते त्यानुषंगाने सदर योजनेअंतर्गत ५० वाढीव जागेचा प्रस्ताव विभागामार्फत मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता.

पंरतू सदरील प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केलेला असून त्यास मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांची मान्यता असल्याचे विभागास अवगत केलेले आहे.

-----------------

## निराधार, अपंग, वृध्द कलावंत तसेच निराधार महिला इत्यादींना हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र तालुका कार्यालयात सादर करण्याची होत असलेली सक्ती

**(३८) * ५०३७९ श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने निराधार, अपंग, वृध्दकलावंत, विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटीत निराधार महिला व वृध्दांसाठी श्रावणबाळ अशा विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी दरवर्षी हयात असल्याचा दाखला व पुरावा तहसिल कार्यालयामार्फत देण्याबाबत सांगण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वी हयातीचे प्रमाणपत्र बँकेत जमा करण्याची मुभा असताना आता दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत तहसिल कार्यालयात जावून हयातीचे पुरावे सादर करण्याची अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाभार्थ्यांना यासाठी तहसिलदार कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याने पुर्वीप्रमाणेच बँकेत हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात यावेत, अशी मागणी लाभार्थ्यांनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) विशेष सहाय्य योजनेच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दरवर्षी लाभार्थ्यांनी त्यांचे जेथे खाते आहे अशा बँक मॅनेंजरकडे अथवा पोस्ट मास्तरकडे स्वत: हजर राहावे व ते हयात असल्याची नोंद बॅक मॅनेजर/पोस्ट मास्तर यांनी घ्यावयाची आहे.

कोणत्याही कारणामुळे लाभार्थी बँकेत हजर राहू शकला नाही तर त्या लाभार्थ्यांने नायब तहसिलदार/तहसिलदार/ उपविभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) यांचे समोर हजर राहून हयातीबाबतचे प्रमाणपत्र संबंधित तहसिलदाराकडे सादर करावे, अशीही दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात तरतूद आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वरीलप्रमाणे हयात प्रमाणपत्र दिनांक ०१ एप्रिल ते ३० जून या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी नगर परिषद (जि.हिंगोली) पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलाच्या निधीत झालेला गैरव्यवहार

**(३९) * ५२१०१ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) नगर परिषदेतील पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलाच्या ६० लाख रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराबाबत तत्कालीन मुख्याधिकारी यांचेवर गुन्हे दाखल करुन नगरपरिषदेच्या ५ वर्षाच्या खर्चाचे विशेष लेखा परिक्षण करण्याची मागणी कळमनुरी शहर विकास मंच यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांना वितरीत करण्यासाठी असलेला रूपये ५६.४० लक्ष इतका निधी तत्कालिन मुख्याधिकारी, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी अनधिकृतपणे नगर पालिका फंडामध्ये वर्ग करून, सदर निधीतून शहर स्तरीय तांत्रिक सल्लागार (CLTC) यांचे माहे फेब्रुवारी, २०२० ते माहे मे, २०२२ पर्यंतचे वेतन अदा केले असल्यामुळे वित्तिय अनियमितता झाली असल्याचे दिसून येते.

(२) कळमनुरी शहर विकास मंच यांच्याकडून अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने प्रकल्प बाधितांसाठी विविध भागात घरांच्या आखलेल्या योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४०) * ४९५९५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांसाठी विविध भागात घरांच्या आखलेल्या योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात एका घरांच्या बांधकामासाठी ८ लाख ४३ हजार रुपये एवढा खर्च येत असताना त्यासाठी ३९ लाख रुपये खर्च येत असल्याचे दाखविण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प बाधितांसाठी घरांच्या योजनेत ७ हजार ४३९ घरे बांधली जाण्याची महानगरपालिकेची योजना असून त्यासाठी नियुक्त विकासकास प्रति चौरस फुटांमागे ३८ हजार रुपये इतका खर्च दिला जाणार असून त्यासह टीडीआर, क्रेडिट नोट देखील दिली जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महानगरपालिका राबवित असलेल्या आश्रय योजनेत २२ लाख रुपयांत घरे बांधली जात असतानाही प्रकल्प बाधितांच्या प्रत्येक घरांसाठी ३८ ते ३९ लाख रुपयांचा खर्च येत असल्याची निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त गैरव्यवहाराबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरप्रकार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, सदर प्रकरणी महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांनी त्यांच्या दिनांक १९ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.लोक आयुक्त यांचेकडे तसेच, पत्रकार परिषद घेऊन कथित अनियमिततेबाबत तक्रार केली होती.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २१ मे, २०२२ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता व महाराष्ट्र टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रांत तसेच, महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर बाबतीत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याबाबत खुलासा करण्यात आलेला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

मुलुंड (पू.) येथील न.भू.क्र. १२८९, १२९०, १२९२, १२९३ व १२९५ या खाजगी मालकीच्या भूभागावर ७४३९ प्रकल्पबाधीत सदनिका बांधण्याच्या योजनेस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर भूभाग खाजगी मालकीचा असल्यामुळे, मोबदला म्हणून विकासकास जमिनीचा टीडीआर अधिक बांधकामाचा टीडीआर अधिक क्रेडिट नोटच्या स्वरुपात प्रति सदनिका अधिमूल्य रु. ३८,००,०००/- इतकी रक्कम देण्यात येणार आहे.
(४) आश्रय योजना फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर राबविण्यात येत असल्यामुळे गृहबांधणीसाठी फक्त बांधकामापोटी देय खर्च लागू होतो.

प्रकल्पबाधीतांचा सदर गृहबांधणी प्रकल्प खाजगी भूखंडावर प्रस्तावित असल्यामुळे जमीन व त्यावर होणारे बांधकाम यापोटी टीडीआर, तसेच क्रेडिट नोट स्वरुपात प्रति सदनिका अधिमूल्य असा एकूण मोबदला लागू होतो.

त्यामुळे आश्रय योजनेच्या दराशी प्रकल्पबाधीतांचा गृहबांधणी प्रकल्पाच्या दरांची तुलना करता येणार नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरांमध्ये ५ कोटी २५ लक्ष इतका निधी अल्पसंख्याक क्षेत्रात वितरित न करता इतरत्र वितरीत केल्याबाबत

**(४१) * ५१३१९ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अल्पसंख्याक बहुल क्षेत्राचा विकास करण्यासाठी अल्पसंख्याक विभागाकडून अनुदान तथा निधी वितरित केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक विभागाने भिवंडी शहरांमध्ये ५ कोटी २५ लक्ष इतका निधी अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निधी भिवंडी शहरातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी न वापरता भिवंडी शहरातील इतर भागात वितरित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत उल्लंघन झाल्यामुळे यास तात्काळ स्थगिती देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन भिवंडीतील अल्पसंख्याक बहुल क्षेत्राकरिता सदर निधी वितरीत करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास योजनेंतर्गत भिवंडी शहरातील अल्पसंख्याक वस्तीमध्ये मुलभूत/पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता शा. नि. ३१/०३/२०२२ अन्वये एकूण रुपये ६ कोटी २५ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) अल्पसंख्याक बहुल नागरी वस्तीमध्ये मुलभूत/पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता राबविण्यात येत असलेल्या क्षेत्रविकास योजनेंतर्गत शा. नि. दि.३१/०३/२०२२ अन्वये भिवंडी शहरातील अल्पसंख्याक वस्तीमध्ये एकूण ११ विकास कामांकरीता रु.६ कोटी २५ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर विकास कामांची सद्यस्थिती तपासून निधी वितरीत करण्याबाबत निर्देश देण्यात येतील.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील हिंजवडी-चाकण व पिंपरी-निगडी मेट्रो मार्गांच्या मंजुरीबाबत

**(४२) * ५०२६८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातून हिंजवडी येथील आयटी पार्क व चाकण एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीएमआरडीएच्या सर्वंकष आराखड्यामध्ये विविध कॉरीडॉरवर मेट्रो प्रणाली राबविण्याबाबत हिंजवडी ते चाकण अशा एकूण ३०.०८ कि.मी अंतरात हा मेट्रो मार्ग विकसित करण्याचे शासनाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड मनपाने पिंपरी ते निगडी आणि नाशिक फाटा ते चाकण साधारणत: १८ ते २० किमी अंतराच्या अशा दोन मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची विनंती ‘महामेट्रो’ला केली असून, त्यास महामेट्रो’ ने तयार केलेल्या पिंपरी- निगडीपर्यंतच्या ‘डीपीआर’ला शासनाने मान्यता दिली असून पिंपरी ते निगडी या प्रकल्पाच्या अहवालाला राज्य शासनाने मंजुरी देऊन तीन वर्षाहून अधिक काळ लोटला असून केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे -पिंपरी-चिंचवड शहराच्या चारही दिशांना मेट्रो मार्गांचे जाळे निर्माण करण्यासाठी मेट्रोच्या उर्वरित कॉरीडॉरचे काम सुरु होण्याकरिता प्रलंबित असलेल्या अहवालाला तातडीने मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी लेखी पत्रान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) पीसीएमसी ते निगडी या विस्तारीत मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवालास (डीपीआर) राज्य शासनाने दि २७.०२.२०१९ रोजी मान्यता प्रदान केली असून सदर प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला होता. केंद्र शासनाने सदर प्रस्तावावर काही निरीक्षणे नोंदवून सुधारित डीपीआर सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यास अनुसरुन सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनाने दि. २५.०२.२०२२ रोजी केंद्र शासनास पाठविला आहे. सद्यस्थितीत सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विनंतीनुसार महामेट्रो ने नाशिक फाटा ते चाकण या मार्गिकेसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करुन पीसीएमसीकडे दि. १७.०९.२०१९ रोजी मंजुरीसाठी सादर केला होता. तद्नंतर सदर मार्गिका मेट्रो निओमध्ये रूपांतरित करुन आणि मार्ग कमी करून तो भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर ते चाकण पर्यंत करण्याची पीसीएमसीद्वारे महा मेट्रोला विनंती केली होती. यामध्ये नाशिक फाटा ते भोसरी हा HCMTR मेट्रो निओ आणि भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर ते चाकण हा मेट्रो ऐवजी मेट्रो निओ असा बदल पिसीएमसीद्वारे सुचविण्यात आला होता. त्यानुसार महामेट्रोमार्फत भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर ते चाकण मेट्रो निओचा डीपीआर तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणीबाबत

**(४३) * ५०३०५ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील इंदू मिल परिसरात उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम शासनाने कंत्राटदारांशी केलेल्या करारानुसार माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्याप प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्मारकाचे काम जलदगतीने होण्यासाठी तत्कालीन मा.समाजकल्याण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची उपसमिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मारकावर आतापर्यंत २४५ कोटी रुपये खर्च झाला असून या वर्षासाठी आणखी २०० कोटीचा निधी प्रकल्पासाठी राखून ठेवण्यात आला असून स्मारकाचे काम तात्काळ पूर्ण करणेबाबत तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या लंडन येथील निवासस्थानी भव्य संग्रहालय उभारणीसाठी शासनाने तरतूद केलेल्या १५ कोटी रुपये निधीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्यांना लागलेला कालावधी, प्रकल्पातील स्मारकाची उंची ३५० फूटावरून ४५० फूट (पादपीठ १०० फूट व पुतळा ३५० फूट) करण्यात आले.तसेच कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटामुळे निर्माण झालेली परिस्थिती यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्या निर्धारीत कालावधीत वाढ

होवून सदर कालावधी मार्च, २०२४ झाला आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरीता कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला असून काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

आजतागायत सद्यस्थितीत प्रकल्पातील सहाय्यभूत इमारतीचे (प्रेक्षागृह, प्रदर्शनाकरीता दालने, संशोधन केंद्र, ग्रंथालय, परीषदा भरवण्यासाठी सभागृह, ध्यानधारणा केंद्र, परीक्रमा पथ, स्मरणिका विक्री केंद्र, प्रतिक्षालय, उपहार गृह, प्रशासकीय कार्यालय, स्वच्छता गृह, बगिचे, वाहनतळ, इ.) ५१ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे व स्मारकातील पादपीठ ११ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्त्यव्य केलेल्या निवासस्थानाचे स्मारकात रूपांतर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकारी व ठेकेदार यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४४) * ५०५३९ श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रकल्पांतर्गत Extended MUIP प्रकल्पाचे व ORDS (Outer Road Development Scheme) प्रकल्पातील संपूर्ण रस्त्याचे आणि उड्डाणपूल प्रकल्पातील Foundation Dept. च्या कामात सुमारे ६०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात अधिक्षक अभियंता व त्यांच्या अधिनस्त कार्यकारी अभियंते व संबंधीत ठेकेदार यांनी संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंबंधी सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व राज्य शासनाकडे लेखी तक्रार केली आहे तसेच सदर तक्रारींच्या अनुषंगाने संपुर्ण कामांचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गैरव्यवहारातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२), (३), (४) व (५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०७.१२.२०२२ रोजीच्या शासनपत्राद्वारे चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणी प्राधिकरणामार्फत आय.आय.टी. मुंबई यांच्या माध्यमातून आवश्यक ती कार्यवाही करीत आहे.

-----------------

## मुंबई विभागातील राज्य परिवहन महामंडळांतर्गत येणाऱ्या विश्रांतीगृहांची झालेली दूरवस्था

**(४५) * ४९५७३ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागातील राज्य परिवहन महामंडळाअंतर्गत येणाऱ्या मुंबई सेंट्रल, परळ, कुर्ला व पनवेल येथील महिलांच्या विश्रांतीगृहांची अत्यंत दुरवस्था झाली असून तेथे पिण्याच्या पाण्याची देखील सुविधा उपलब्ध नसल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकडे राज्य परिवहन महामंडळाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची तक्रार राज्य एसटी कामगार संघटनेच्या महिला अध्यक्षा यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महिला कर्माचाऱ्यांना योग्य त्या सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विश्रांतीगृह, बसेस, स्वच्छतागृह यांच्या नियमित स्वच्छतेकरीता देखरेख ठेवण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता समिती नेमण्यात आली असून समितीने दर आठवड्याला शासनास अहवाल सादर करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वेगवेगळया विभागांमध्ये दिलेल्या कंत्राटांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४६) * ४९६३४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ ते २८ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत वेगवेगळया विभागांमध्ये दिलेल्या कंत्राटामध्ये १२ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिलेल्या कंत्राटांची कॅग मार्फत चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना काळात झालेल्या ३५३८ कोटींची मध्यवर्ती खरेदी, अजमेरा विकासकाकडून महानगरपालिकेने ३३९ कोटी रुपयांमध्ये विकत घेतलेला भूखंड, चार पुलांच्या बांधकामावर झालेला १४९६ कोटी रुपयांचा खर्च, कोरोना काळात ९०४ कोटी रुपयांची खरेदी याबाबत कॅगच्या विशेष लेखापरिक्षणाव्दारे चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील काही मोठ्या कामांचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांना दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी पत्र पाठविले आहे.
(४) प्रधान महालेखाकार यांचे विशेष लेखापरीक्षण प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय हरित लवादाने राज्य शासनाला पर्यावरण विषयक नियमांचे पालन न केल्याने दंड आकारल्याबाबत

**(४७) * ४९९९२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवादाने राज्य शासनाला पर्यावरण विषयक नियमांचे उल्लंघन तसेच घन आणि द्रवरुप कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न केल्याने सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दंडाच्या रक्कमेचा वापर मुख्य सचिवांच्या सूचनेनुसार पर्यावरणाच्या संवर्धनासाठी करण्याची सूचना हरित लवादाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी कोणती कालबध्द उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, पर्यावरण विषयक नियमांचे उल्लंघन प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र.६०६/२०१८ मध्ये दिनांक ८/९/२०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान राज्यातील नागरी घनकचरा व सांडपाणी यांचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी रुपये १२ हजार कोटीं इतकी रक्कम स्वतंत्र खात्यामध्ये जमा करून मा.मुख्य सचिवांच्या निर्देशांनुसार नागरी घनकचरा व घरगुती सांडपाणी व्यवस्था करण्याकरीता वापरण्यात यावी असे निर्देश दिले आहेत.

(३) राज्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० व अमृत २.० या योजनांतर्गत घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रिया, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणी व जोडणी, प्रक्रिया व पुर्नवापर याकरीता सुमारे रुपये २१,३९३ कोटींचा आराखडा तयार केला असून सदर आराखड्यांनुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करण्याचे नियोजन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या प्रमाणात होत असलेली वाढ

**(४८) * ४९४९४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.राहूल पाटील**

**(परभणी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वत्र गेल्या वर्षभरात १० हजार ८८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: माहे जानेवारी-सप्टेंबर, २०२२ या ९ महिन्याच्या कालावधीत विदर्भात ११००, मराठवाडयात ७५६, अमरावती विभागात ६१२ आणि नागपूर विभागात १९८ शेतकऱ्यांनी अतिवृष्टी, सततची नापिकी, दूबार-तिबार पेरणी, वाढीव उत्पादन खर्च, खाजगी सावकारांकडून होणारा छळ, कर्जावरील व्याज, बँकानी कर्ज नाकारणे, कर्जबाजारीपणा तसेच शासनाकडून आर्थिक मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याची व प्रचलित आणेवारी पध्दतीचे निकष बदलून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे, लागवड खर्च, शेतमालास योग्य भाव, सिंचन सुविधा, पिक पद्धतीत बदल, सहज पतपुरवठा, पिक विमा योजनेत सुसुत्रता इत्यादी अनेक स्तरावर उपाययोजना करुन शेतकरी आत्महत्या कायमस्वरुपी थांबविण्यासह आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना त्वरीत आर्थिक मदत करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदी शाखा अहवालानुसार, सन २०२१ या वर्षी कृषी क्षेत्रामध्ये देशात एकूण १०,८८१ शेतकरी व शेतमजूरांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी राज्यात २६४० शेतकऱ्यांच्या व १४२४ शेतमजूरांच्या अशा एकूण ४०६४ (शेतकरी व शेतमजूर मिळून) आत्महत्या झाल्याची नोंद आहे.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीत राज्यात शेतकरी आत्महत्यांची एकूण २१३८ प्रकरणे आढळून आली आहेत. त्यामध्ये अमरावती ८१७, नागपूर २६०, (विदर्भ १०७७ प्रकरणे), औरंगाबाद ७५६ एवढी विभागवार शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आहेत.

(३) शेतकरी आत्महत्यांच्या एकूण २१३८ प्रकरणांपैकी ११५९ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने मदतीकरिता पात्र ठरविली आहेत. एकूण ५१२ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने अपात्र ठरविली असून ४६७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र ११४८ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासन निर्णय दि.२३.१.२००६ अन्वये प्रत्येकी रू.१ लक्ष एवढी मदत देण्यात आली आहे. उर्वरित पात्र प्रकरणी मदत देण्याची तसेच चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय समितीमार्फत सुरू आहे.

खरीप २०१७ हंगामापासून आणेवारी/पैसेवारी पद्धतीनुसार दुष्काळ घोषित करण्यात येत नाही. त्यामूळे आणेवारी नुसार मदत देण्यात येत नाही. प्रत्यक्ष पंचनाम्याच्या आधारे शेतीपिकांचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार मदत देय आहे. चालू हंगामातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने व २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२२ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असून आतापर्यंत रू.६४५०.०८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यास मानयता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत भात, गहू, कडधान्य, भरडधान्य व पोष्टीक तृणधान्य पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारीत प्रात्यक्षिके, सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे वितरण, सुधारीत कृषी औजारे व सिंचन सुविधा साधानांना अर्थसहाय्य इ. बाबी राबविण्यात येत आहेत. तसेच कापुस व ऊस पिकाची उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारीत प्रात्यक्षिके, पीक संरक्षण औषधे, उती संवर्धित रोपे व कॉटन श्रेडर, शुगरकेन थ्रश कटर इ.बाबी राबविण्यात येत आहेत. विदर्भ व मराठवाड्याची शेतकाऱ्यांची उत्पादकता इतर प्रगत शेतकऱ्यांबरोबर आणण्यासाठी व मुल्य साखळी विकासासाठी एकात्मिक कापुस, सोयाबीन व इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकास योजना राबविण्यात येत आहे. यात प्रामुख्याने पिकांची उत्पादकता वाढ व

शेतकऱ्यांची क्षमता बांधणी, बियाणे साखळी बळकटीकरण, मुल्य साखळी विकास व प्रचलित योजनांची सांगड इ.बाबींचा समावेश आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ठिबक व तुषारसिंचन संच बसविण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. शेतमालास उत्पादन व खर्चावर आधारीत किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी केंद्र शासनामार्फत खरीप व रब्बी हंगामापूर्वी दरवर्षी कार्यवाही करण्यात येते. पीक विविधीकरणांतर्गत कडधान्य, गळीतधान्य व फलोत्पादन पिकाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढीसाठी विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ च्या सुधारीत मार्गदर्शक सुचनेनुसार ( Revamped Operational Guidelines ) राज्यात राबविण्यात येत आहे. तसेच योजनेंतर्गत वेळोवेळी सुधारणा करणेबाबत केंद्रस्तरावर तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे.
राज्यातील विविध बँकांमार्फत सन २०२१-२२ च्या रब्बी हंगामामध्ये बँकांनी माहे मार्च, २०२२ अखेर १४०७५३४ शेतकऱ्यांना रू.१५६६६.३२ कोटी (७९%) रकमेचे पीक कर्ज वाटप केले आहे. त्याचप्रमाणे सन २०२२ च्या खरीप हंगामामध्ये माहे सप्टेंबर, २०२२ अखेर बँकांनी ४२८३६८० शेतकऱ्यांना रू.३८८०५.६३ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप केलेले आहे.

सहकार विभागामार्फत दि. २७.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली आहे. तसेच अल्पमुदत कर्जाची पूर्णत: परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या रकमेवर जास्तीत जास्त रू.५०,०००/- पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याबाबत दिनांक २९.०७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता दर्जाहीन असल्याबाबत

**(४९) * ४९७६३ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेने गेल्या अडीच वर्षात रस्त्यांच्या कामासाठी सुमारे साडेसहाशे कोटी रुपये खर्च करुन देखील पावसाळ्यात उक्त रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे विविध संघटनांकडून माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता दर्जाहीन असल्याबाबत नाशिक महानगरपालिकेला माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान असंख्य तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरात दर्जेदार रस्ते तयार करण्यासाठी या कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये घेतला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्त्याच्या कामांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी बांधकाम विभागासह गुणवत्ता नियंत्रण विभागाची असल्यामुळे शासनाने प्रश्न भाग (१) व भाग (२) मधील तक्रारींची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार खराब रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी कार्यवाही व दर्जाहीन काम करणाऱ्या संबंधितांवर शासनाने जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर पावसाळयात खड्डे पडल्यामुळे विविध संघटनांकडून महानगरपालिकेस निवेदने प्राप्त झाली असून, याबाबत आंदोलने करण्यात आली, ही बाब खरी आहे.

नाशिक महानगरपालिकेमार्फत मागील तीन वर्षात रस्त्यांच्या कामांकरिता एकूण रु.४८९.७२ कोटी खर्च करण्यात आलेला असून, गेल्या अडीच वर्षात रस्त्यांच्या कामासाठी साडेसहाशे कोटी रुपये खर्च करण्यात आले, ही बाब खरी नाही.

(२) होय.

नाशिक शहरामध्ये सद्यस्थितीत भुयारी गटारींची कामे, पाणीपुरवठ्याची कामे, भुमीगत MNGL गॅस पाईपलाईन, रिलायन्स, एअरटेल, जिओ फायबर इत्यादी कंपन्यांचे केबल नेटवर्किंगची कामे यामुळे अनेक रस्त्यांवर खोदकामे सुरु असल्यामुळे, त्याचप्रमाणे महानगरपालिका हद्दीत स्मार्ट सिटी अंतर्गत सुध्दा अनेक विकास कामे सुरु असल्याने, नागरिकांच्या तक्रारी व निवेदने महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहेत.

(३), (४) व (५) नाशिक महानगरपालिकेमार्फत रस्त्यांची कामे करतांना सदर कामे गुणवत्तापुर्वक होण्याच्या दृष्टीने पुरेपुर दक्षता घेण्यात येते.

तसेच, नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि.२८/०३/२०१८ नुसार कामांचे त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक या संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन कामांचे गुणवत्ता नियंत्रणाच्या दृष्टीने त्रयस्थ संस्था नेमणुकीची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३० किलोमीटर मार्गावर**
**नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्पाच्या उभारणीबाबत**

**(५०) * ४९८६८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३० किलोमीटर मार्गावर नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्पाच्या उभारणीसाठी परिसरातील ५० पेक्षा जास्त इमारती तसेच चाळींची जागा लागणार असल्याने सदर इमारतींच्या पुनर्विकासासाठी महानगरपालिकेने ना-हरकत प्रमाणपत्र देणे बंद केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार इमारतींच्या पुनर्विकासासाठी आवश्यक त्या परवानग्या देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) ठाणे शहरात शासन निर्णय दिनांक ३०.०३.२०२२ अन्वये HCMTR ची सुधारीत आखणी व अंतर्गत मेट्रोची आखणी मंजूर करण्यात आली असून सद्यस्थितीत सदरची अमंलबजावणी करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार अंतर्गत मेट्रोच्या आखणीमध्ये बाधीत होत असलेल्या ठाणे शहरातील इमारतींचे पुनर्बांधणीचे प्रस्ताव महानगरपालिकेत दाखल झाले असून त्यापैकी दोन पुनर्बांधणी प्रस्तावांना अनुक्रमे दिनांक २२.०६.२०२२ व दिनांक १३.०७.२०२२ रोजी नामंजूरी कळविण्यात आली आहे. तथापि, सदर कार्यवाही महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांच्या तांत्रिक अभिप्रायानंतर केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, अंतर्गत मेट्रो आखणी व विकसन प्रकल्पाची अमंलबजावणी करताना शहरातील बाधीत होणाऱ्या इमारतीच्या पुनर्विकसनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांच्या तांत्रिक सल्ल्यानुसार महानगरपालिका स्तरावर कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबई विमानतळ येथील मनोरंजन मैदानासाठी राखीव असलेला भूखंड मॉर्स हॉटेल ॲण्ड रिसॉर्ट या कंपनीला देवून आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(५१) * ४९६७४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळ येथील जे.डब्ल्यु. मॅरिऑट हॉटेलच्या शेजारील मनोरंजन मैदानासाठी राखीव असलेला भूखंड (सन १९९१ च्या सुधारित अधिसूचनेनुसार) मॉर्स हॉटेल ॲण्ड रिसॉर्ट प्रा. लि. या हॉटेल मालकास २२ वर्षाचे सुमारे १२५ कोटी रुपये प्रिमियम शुल्क माफ करुन महसूल विभागाचे प्रमाणपत्र व परवाना तसेच व्यवसाय/बांधकाम प्रमाणपत्र देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांचे संगनमत असून यामध्ये शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर प्रकरणी हॉटेल मालकाने भूखंडाच्या बाजूला असलेल्या साडेतीन मीटरचा नाला बेकायदेशीरपणे आरसीसी स्लॅब घालून बुजविला असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन हॉटेल मालक तसेच जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करुन बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ नुसार नाजकधा कलम २० चे आदेश व नाजकधा कलम १०(३)/१०(५) नुसार केलेली कार्यवाही संरक्षित आहे. सबब, ज्या जमिनींना नाजकधा कलम २० खाली सुट दिलेली नाही किंवा नाजकधा कलम १०(३)/१०(५) अंतर्गत जमिनींचा ताबा घेण्यात आलेला नाही, अशा जमिनींच्या विकासासाठी नाजकधा अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याबाबत शासन परिपत्रक दि.०७.०६.२०११ नुसार सर्व नागरी समुहांच्या सक्षम प्राधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

याशिवाय तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांनी दि.२०.१.२००५ च्या पत्रानुसार सि.टी.एस.क्र.१४५८ व इतर मधील १७,४९७.६२ चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार आर.जी. साठी आरक्षीत असल्याने सदरचे क्षेत्र बिनमोकळे असल्याने त्या क्षेत्राला नाजकधा अधिनियमाच्या तरतूदी लागू होत नसल्याबाबत जमिनधारकास कळविले आहे.

वरील पार्श्वभूमीवर मौजे-मरोळ, ता.अंधेरी येथील स.क्र. ११०/२(भाग) व इतर मधील क्षेत्रावर नाजकधा कलम २० अन्वये सूटीचे रितसर आदेश पारीत केलेले नसल्याने व सदर क्षेत्रावर नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार कार्यवाही होवून जमिनीचे संपादन केले नसल्याने सदर प्रकरणी शासन परिपत्रक दि.०७.०६.२०११ नुसार कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांना शासन पत्र दि.२२.१२.२०२१ अन्वये कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाद्वारे सदर भूखंडावर अस्तित्वात असलेला १.८ मीटर व्यासाचा पाईप ड्रेन ऐवजी ३.२ मीटर X २.० मीटर आकाराचा पजवा पेटीका बांधण्याचे नियोजित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेच्या धर्तीवर शैक्षणिक साहित्य व निर्वाह भत्ता देण्याबाबत

**(५२) * ४९५९८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागातील ४४५ वसतिगृहांमध्ये पन्नास हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थांना शासनाच्या नियमांनुसार निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय रकमा सहा महिन्यापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद होती, परंतु ऑनलाइन शिक्षण सुरू होते, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने विद्यार्थ्यांनी शहराच्या ठिकाणी भाड्याची खोली घेवून शिक्षण पूर्ण केले त्यामुळे केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने या काळातील १९ महिन्याचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांचा खर्चही विद्यार्थ्यांना देण्यास नकार दिल्यामुळे या विद्यार्थ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, चेंबूर (मुंबई) येथील संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी संबंधित सहाय्यक आयुक्तांना निवेदन देऊन मागील तीन वर्षाचा निर्वाहभत्ता व इतर सुविधा द्याव्यात अशी मागणी केल्याचेही व स्वाधार योजनेच्या धर्तीवर वसतिगृहातील शैक्षणिक साहित्य व निर्वाह भत्ता देण्यात यावा अशी मागणी स्टुडंट राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया ने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) होय.

संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतिगृह,चेंबूर या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या वर्षाचा निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य, छत्र्या, रेनकोट इत्यादी तसेच ऑक्टोबर, २०२१ ते सप्टेंबर, २०२२ पर्यंतचा निर्वाह भत्ता व सन २०२२-२३ चे शैक्षणिक साहित्य, छत्र्या, रेनकोट इत्यादीच्या रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सन २०१९-२० या वर्षात मार्च, २०२० पासून देशभरात टाळेबंदी (लॉकडाऊन) घोषित करण्यात आल्याने तसेच सामाजिक न्याय विभागाची बहुतांश वसतिगृहे सबंधित जिल्हाधिकारी यांनी विलगीकरण केंद्रासाठी (क्वारंटाईन सेंटर) अधिग्रहीत केल्याने ऑक्टोबर, २०२१ पर्यंत वसतिगृहे पूर्णपणे बंद होती.

दिनांक २६ जुलै,२०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्वाहभत्ता हा केवळ वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांनाच देय आहे. यामुळे मार्च, २०२० ते ऑक्टोबर, २०२१ या काळात वसतिगृहे पूर्णपणे बंद असल्याने या बाबतीत निर्वाह भत्ता न देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(५३) * ४९५७७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाचा काही भाग कोसळल्यानंतर दोन वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर सन २०२० मध्ये मुंबई महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुलाचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश दिले व माहे एप्रिल, २०२२ पर्यत पुलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित असतांनाही आजमितिस पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे खुप मोठया प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर पूल जीर्णावस्थेत असल्यामुळे सल्लागाराच्या अभिप्रायानुसार वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सबब दक्षिणेकडील कॅप्टन गोरे पूल, मिलन आर.ओ.बी. व उत्तरेकडील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल येथे वाहतुक वळविण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अंधेरी येथील पूर्व-पश्चिम भागाला जोडणाऱ्या गोपालकृष्ण गोखले पुलाच्या दोन्ही बाजूच्या पोहोच मार्गाच्या कामासाठी (रेल्वे भाग वगळून) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे एप्रिल, २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आला होता.

तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव व वाहतुक विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेला उशीर या कारणांमुळे सदर पुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये सुरु करण्यात आले.

सद्य:स्थितीत उत्तरेकडील अर्ध्या पुलाच्या महानगरपालिकेच्या हद्दीतील पुलाचे काम प्रगतीपथावर असून, ते माहे जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर पुलाच्या रेल्वेवरील भागाचे निष्कासन रेल्वेमार्फत करण्यात येत असून, तद्नंतर त्या भागाच्या पुनर्बांधणीची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करण्याबाबत**

**(५४) * ४९६२७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य परिवहन महामंडळातून निवृत्त झालेल्या तब्बल ८५०० कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरचे देय असलेले रजेचे पैसे व वेतनवाढ फरकाचे पैसे, भविष्यनिर्वाह निधी उपदान, एल.आय.सी. व इतर देणी एसटी महामंडळाकडून माहे जुलै, २०१९ पासून देण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून महागाई भत्त्याचा दर ३१ टक्केवरुन ३४ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे, परंतु राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना २८ टक्के दराने महागाई भत्ता अदा करण्यात येत असल्यामुळे शासनाप्रमाणे महागाई भत्त्याचा दर लागू केलेला नाही. तसेच दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून घरभाडे भत्त्याच्या दराची थकबाकी तसेच वार्षिक वेतनवाढीच्या दराची थकबाकी देणे प्रलंबित आहे, तसेच कोरोना काळात ३०० रुपयांप्रमाणे जाहीर केलेला प्रोत्साहन भत्ता देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी तात्काळ देण्याबाबत राज्य मानवाधिकार आयोगाने राज्य परिवहन महामंडळ प्रशासनाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सर्व देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) रा. प. कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याच्या पुढील महिन्यापासून भविष्यनिर्वाह निधी उपदान, एल.आय.सी. व इतर देणी त्यांस नियमीत अदा करण्यात येत आहेत. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळातील जानेवारी २०२० ते सप्टेंबर २०२२ या कालावधीतील सेवानिवृत्त अधिकारी तथा कर्मचारी यांची रजा वेतन व वेतनवाढ फरकाची रक्कम प्रलंबित आहे.
(२) रा.प. कर्मचाऱ्यांस महागाई भत्त्याचा दर माहे नोव्हेंबर, २०२२ पासून ३४ टक्के असा करण्यात आला आहे. वाढीव घरभाडे भत्ता तसेच वाढीव वार्षिक वेतनवाढ रा.प.महामंडळामध्ये दि.०१ नोव्हेंबर २०२१ पासून मंजूर करण्यात आली आहे व त्यानुसार अदा करण्यात येत आहे. त्यामुळे थकबाकीचा प्रश्न उदभवत नाही.
संचारबंदी क्षेत्रात प्रत्यक्ष कामगिरी केलेल्या सर्व पात्र रा.प.कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता अदा करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्य परिवहन महामंडळाच्या निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवृत्तीनंतरची रजा रोखीकरण व करार हप्ते अदा करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.